रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १८ • अंक २२७
www.ramprahar.com

• शुक्रवार, ६ मार्च २०२६ • पाने ८ • किंमत ₹२

## अंतरंग

खालापुरात गॅस पाईपच्या स्फोटात एकाचा मृत्यू/२
उर्दू शाळेत मराठी भाषेचा जयजयकार/५
वरसोली बीचलगत क्रिकेट स्पर्धा रंगली/८

## धर्मांतरणविरोधी विधेयकाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी



**मुंबई :** महाराष्ट्रातील फडणवीस सरकारने दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या धर्मांतरणविरोधी विधेयकाला गुरुवारी (दि.५) अखेर मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी दिली. आता लवकरच हे विधेयक विधानसभेत मांडले जाणार असून त्यानंतर शासन निर्णय (जीआर) जारी केला जाणार आहे. नवीन प्रस्तावित कायद्यानुसार जर कोणी जबरदस्ती, फसवणूक किंवा प्रलोभन देऊन धर्मांतरण घडवून आणले, तर त्याच्यावर अजामीनपात्र गुन्हा दाखल केला जाईल. याबाबत मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, अशा प्रकरणांमध्ये आरोपींना अटक करण्याची तरतूद असून सहज जामीन मिळणार नाही. कायद्याच्या सर्व तांत्रिक बाबी लवकरच सार्वजनिक केल्या जातील. त्यांनी दावा केला की, हा कायदा मध्य प्रदेश आणि गुजरातमधील धर्मांतरणविरोधी कायद्यांपेक्षा अधिक कठोर आणि प्रभावी असेल.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज मांडणार महाराष्ट्राचे बजेट | अर्थव्यवस्थेत ७.९ टक्के वाढ अपेक्षित

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशातील सर्वात मजबूत आणि गतिशील अर्थव्यवस्थांपैकी एक असून चालू आर्थिक वर्षात ती ७.९ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज राज्याच्या आर्थिक पाहणी २०२५-२६ अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील संतुलित वाढ, पायाभूत सुविधांमधील मोठी गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभतेसाठी केलेल्या सुधारणा यामुळे राज्याची आर्थिक स्पर्धात्मकता अधिक बळकट झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शुक्रवारी (दि. ६) राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्राचा अर्थसंकल्प मांडणार आहेत. या पार्श्वभूमीवर बुधवारी राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल विधानसभेत वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांनी, तर विधान परिषदेत राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सादर केला.



### देशाच्या जीडीपीत राज्याचा सर्वाधिक वाटा

पहिल्या सुधारित अंदाजानुसार २०२४-२५मध्ये देशाच्या सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १४ टक्के असून तो देशातील सर्वाधिक आहे. राज्यात रस्ते, मेट्रो, बंदरे, विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात झालेल्या गुंतवणुकीमुळे पायाभूत सुविधांचा विकास वेगाने होत असल्याचे अहवालात नमूद केले आहे. एकंदर आर्थिक पाहणीत सकारात्मक चित्र दिसत आहे.

या अहवालानुसार २०२५-२६मध्ये राज्याचे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ५१,००,५९७ कोटी रुपये इतके अपेक्षित आहे, तर वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न २८,८२,६९९ कोटी राहण्याचा अंदाज आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न ३,४७,९०३ रुपये इतके अपेक्षित असून ते अखिल भारताच्या दरडोई उत्पन्नाच्या (२,१९,५७५ रुपये) तुलनेत लक्षणीय अधिक आहे.

अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०२५-२६मध्ये राज्याची महसुली जमा ५,६०,९६४ कोटी रुपये अपेक्षित आहे. यापैकी ४,७७,४०० कोटी रुपये कर महसूल आणि ३३,०५२ कोटी रुपये करेतर महसूल अपेक्षित आहे. राज्याने गेल्या दशकात राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्याचा प्रयत्न कायम ठेवला आहे. २०२५-२६मध्ये ती २.७ टक्के राहण्याचा अंदाज आहे.

महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५ अंतर्गत राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्यावर भर देण्यात आला आहे. डिसेंबर २०२५पर्यंत ६३.८५ लाख सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची नोंदणी झाली असून त्यातून २.५२ कोटींहून अधिक रोजगार निर्माण झाले आहेत.

देशातील थेट परकीय गुंतवणुकीत ३१ टक्के वाट्यासह महाराष्ट्र अग्रस्थानी आहे तसेच स्टार्टअप्सच्या संख्येतही राज्याचा देशात सर्वाधिक १७ टक्के हिस्सा आहे.

# राज्यात ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी

## कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधान परिषदेत दिली महत्त्वपूर्ण माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

शेतकरी कर्जमाफीबाबत प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात अहवाल अपेक्षित आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफीबाबत निर्णय जाहीर करतील, अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी गुरुवारी (दि.५) विधान परिषदेत दिली.



विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कलम २६० अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना कृषीमंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. राज्यातील शेती अधिक सक्षम, आधुनिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यासाठी महाराष्ट्राने २०२५ ते २०२९ या कालावधीसाठी स्वतंत्र कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरण जाहीर केले असून असे धोरण राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे, असे यावेळी कृषीमंत्र्यांनी सांगितले.

कृषीमंत्री भरणे पुढे म्हणाले की, राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून मागील नऊ वर्षांत सुमारे ३७,५०० कोटींपेक्षा जास्त नुकसानभरपाई देण्यात आली. खरीप हंगाम २०२५-२६पासून उत्पादनावर आधारित सुधारित पीक विमा योजना लागू केली आहे. बीड पॅटर्न ८०-११० मॉडेल राबवून विमा कंपन्यांच्या नफ्यावर २० टक्क्यांची मर्यादा घालण्यात आली आहे. वन्यप्राणी व स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीसाठी भरपाईचा निर्णय घेतला आहे. याशिवाय विविध योजनांद्वारे शेतकऱ्यांना लाभ, सुविधा दिल्या जातात.


फेब्रुवारी ते डिसेंबर २०२५ या काळात अतिवृष्टीमुळे १.३६ कोटी शेतकरी बाधित झाले असून १.०६ कोटी हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले. यासाठी २०,१९४ कोटींची मदत जाहीर करण्यात आली असून त्यापैकी १५,६६१ कोटी वितरित करण्यात आले आहेत. मदतीची मर्यादा दोन हेक्टरवरून तीन हेक्टरपर्यंत वाढविण्यात आली आहे, असेही कृषीमंत्र्यांनी नमूद केले.

### ‘माय ॲग्री’ एआय धोरण

राज्यात हवामानातील अनिश्चितता, कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव, उत्पादन खर्चातील वाढ व बाजारभावातील चढ-उतार यामुळे शेती अधिक जोखमीची झाली आहे. या पार्श्वभूमीवर दीर्घकालीन उपाय म्हणून ‘माय ॲग्री’ एआय धोरण आखण्यात आले आहे, असे सांगून कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, या अंतर्गत हवामानाचा अचूक अंदाज, कीड-रोगाचा पूर्व इशारा, सिंचन व खत व्यवस्थापन मार्गदर्शन, बाजारभावाचा अंदाज, पीक उत्पादन वाढ होईल. यासाठी एआय, जनरेटिव्ह एआय, ड्रोन व रोबोटिक्सचा वापर होणार आहे.

# महाराष्ट्रात राज्यसभेची निवडणूक बिनविरोध

## शिवसेनेकडून डॉ. ज्योती वाघमारेंना संधी



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यसभेवर महाराष्ट्रातून निवडून दिल्या जाणाऱ्या सात जागांसाठी तेवढेच उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे राज्यात ही निवडणूक बिनविरोध झाली असून औपचारिक घोषणा १६ मार्चला होईल.

महाराष्ट्रात राज्यसभा निवडणुकीसाठी भाजपने राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, रामराव वडकुते आणि माया इवनाते हे चार उमेदवार जाहीर केले होते. राष्ट्रवादी काँग्रेसने दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना संधी देण्याचा निर्णय घेतला, तर महाविकास आघाडीकडून ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे नाव निश्चित झाले. त्यानंतर शिवसेनेच्या उमेदवाराबाबत शेवटच्या क्षणापर्यंत सस्पेन्स कायम होता. अखेर शिवसेनेने आंबेडकरी चळवळीतून पुढे आलेल्या सोलापूरच्या डॉ. ज्योती वाघमारे यांचे नाव गुरुवारी (दि.५) घोषित केले. सात जागांसाठी अतिरिक्त अर्ज दाखल न झाल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली आहे.

## निवडक

### इराणचा अमेरिकेवर पलटवार; तेल टँकरवर क्षेपणास्त्र हल्ला

**तेहरान :** अमेरिकेने आयआरआयएस देना या युद्धनौकेवर केलेल्या हल्ल्याचा बदला इराणने अवघ्या २४ तासांत घेतला आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सच्या दाव्यानुसार त्यांनी पर्शियन आखातात अमेरिकन तेल टँकरवर भीषण क्षेपणास्त्र हल्ला करत प्रत्युत्तर दिले आहे. इराणी परराष्ट्रमंत्र्यांनी श्रीलंकेच्या किनाऱ्याजवळ आयआरआयएस देना या युद्धनौकेवर केलेल्या हल्ल्याचा अमेरिकेला पश्चात्ताप होईल, असा इशारा नुकताच दिला होता. त्यानंतर त्यांनी कारवाई केली.

### वाहतूकदार संघटनांनी राज्यव्यापी संप घेतला मागे

**मुंबई :** अन्यायकारक ई-चलान रद्द करण्याबाबत शासन सकारात्मक भूमिका घेणार आहे तसेच वाहतूकदारांच्या विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी पोलीस व परिवहन विभागाची संयुक्त बैठक बोलावण्यात येणार आहे. या आश्वासनानंतर राज्यातील वाहतूकदार संघटनांनी पुकारलेला राज्यव्यापी संप मागे घेतला, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

# कर्जतच्या दुर्गम तुंगी गावात बिबट्याची दहशत

## एकाच रात्री तीन वासरांचा फडशा



(प्रातिनिधिक छायाचित्र)

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील अतिदुर्गम डोंगराळ भागात वसलेल्या तुंगी गावामध्ये गेल्या काही दिवसांपासून वन्यजीवांच्या हल्ल्यांचे सत्र सुरूच आहे. बिबट्याने मध्यरात्री तेथील एका शेतकऱ्याच्या गोठ्यातील तीन वासरांचा एकामागून एक फडशा पाडला. या भयंकर हल्ल्यामुळे पशुपालक हवालदिल झाले असून संपूर्ण तुंगी परिसरात दहशत पसरली आहे.

तुंगी गावातील ग्रामस्थांचा मुख्य उदरनिर्वाह शेती आणि पशुपालनावर अवलंबून आहे. रात्री गाव शांत झोपलेले असताना बिबट्याने हनुमान शिवाजी सुपे यांच्या घराशेजारील गोठ्यात प्रवेश केला आणि तीन लहान वासरांवर हल्ला चढवला. सकाळी सुपे कुटुंब गोठ्यात गेले, तेव्हा त्यांना रक्ताच्या थारोळ्यात पडलेली वासरे दिसून आली. घटनेची माहिती मिळताच वनविभाग आणि पशुसंवर्धन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला आहे.

तुंगी गाव निसर्गरम्य असले तरी गेल्या चार ते पाच वर्षांपासून बिबट्याच्या वावरामुळे हे गाव डेंजर झोन बनले आहे. येथे डोंगराळ आणि झाडाझुडपांचा भाग असल्याने बिबट्याला लपण्यासाठी सुरक्षित जागा मिळते. यापूर्वीही अनेक शेतकऱ्यांच्या शेळ्या, मेंढ्या आणि गायी-म्हशींवर बिबट्याने हल्ले केले आहेत, मात्र आता बिबट्या थेट घराच्या उंबरठ्यापर्यंत पोहचल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.

बिबट्याच्या या वाढत्या उपद्रवामुळे भविष्यात जीवितहानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून वनविभागाने तातडीने पिंजरा लावून नरभक्षक बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

# पनवेल येथील भाजी मार्केटमध्ये कापडी पिशव्यांचे व्हेंडिंग मशीन

## इनरव्हील क्लबचा पर्यावरणपूरक उपक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरण संरक्षण आणि प्लास्टिकमुक्तीचा संदेश देण्यासाठी इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे शहरातील कृष्णाळे तलावाजवळ असलेल्या गणेश भाजी मार्केटमध्ये कापडी पिशव्यांचे व्हेंडिंग मशीन बसविण्यात आले आहे. या उपक्रमाचे उद्घाटन महापौर नितीन पाटील आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या हस्ते गुरुवारी (दि.५) करण्यात आले.

या कार्यक्रमास नगरसेवक दशरथ म्हात्रे, इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या एसी मेंबर डॉ. शोभा पालेकर, वर्षा ठाकूर यांच्यासह क्लबच्या सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

प्लास्टिक पिशव्यांच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होत आहे. प्लास्टिक कचऱ्यामुळे नाले तुंबणे, जनावरांना होणारे नुकसान तसेच माती आणि पाण्याचे प्रदूषण यांसारख्या समस्या निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांना पर्यावरणपूरक पर्याय सहज उपलब्ध व्हावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

भाजी मार्केटमध्ये येणाऱ्या ग्राहकांना या व्हेंडिंग मशीनद्वारे १० रुपयांचे नाणे टाकून सहजपणे कापडी पिशवी खरेदी करता येणार आहे. कापडी पिशव्या टिकाऊ, पुन्हा वापरता येण्याजोग्या आणि पर्यावरणपूरक असल्याने प्लास्टिकचा वापर कमी करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे बाजारात खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता वाढण्यासही हातभार लागेल.

इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे समाजहिताचे विविध उपक्रम सातत्याने राबविले जात असून हा उपक्रमही पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे. नागरिकांनी कापडी पिशव्यांचा वापर करून प्लास्टिकमुक्त समाज घडविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन क्लबच्या प्रेसिडेंट शुभांगी पिंपळकर व सेक्रेटरी डॉ. अमृता नाईक यांनी केले आहे.

# तापमानाचा पारा चढला!

## उन्हाच्या झळांनी नागरिक हैराण

**मुंबई : प्रतिनिधी**

दक्षिण राजस्थान आणि उत्तर गुजरातच्या सीमेवर निर्माण झालेल्या उच्च दाबाच्या क्षेत्राचा परिणाम आणि उत्तर भारताकडून वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे महामुंबईसह संपूर्ण कोकणपट्टा तापला आहे. तापमानात अचानक लक्षणीय वाढ झाल्याने नागरिक उन्हाच्या झळांनी हैराण झाले

सध्या सकाळपर्यंत तापमान दिलासादायक असते, मात्र दुपारी उन्हाची तीव्रता वाढली आणि सूर्य माथ्यावर आल्यानंतर वैशाख सुरू झाला की काय, असे वाटू लागले. उन्हाची तीव्रता वाढल्याने जिवाची काहिली होऊ लागली. मार्चमध्ये महिन्यातच तापमानाचा पारा ३८ अंश सेल्सिअसवर जात आहे. दरम्यान, महाराष्ट्राकडे येणाऱ्या उष्ण वाऱ्यांचा प्रभाव पुढील काही दिवस कायम राहण्याची शक्यता आहे.



### थंडपेय, फळांना मागणी वाढली

वाढत्या उष्णतेमुळे थंडपेयांच्या मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहेत. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच उष्णतेचे प्रमाण वाढले असल्याने त्यापासून वाचण्यासाठी नागरिकांकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. शरीराला थंडावा देण्यासाठी नागरिकांची पावले थंडपेयांकडे वळली आहेत. लिंबू व कोकम सरबत, उसाचा रस, विविध फळांच्या ज्युसला पसंती मिळत आहे. याशिवाय गारेगार कलिंगड, ताडगोळे, शहाळे यांनाही मागणी वाढल्याचे दिसून येत आहे.

# स्लॅब कोसळून विद्यार्थ्याचा मृत्यू

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईच्या कोपरखैरणे सेक्टर २ येथील इमारतीचा स्लॅब कोसळल्याची घटना गुरुवारी (दि. ५) संध्याकाळी घडली. स्लॅबखाली खासगी शिकवणीतील जवळपास ११ विद्यार्थी अडकून पडले होते. घटनेची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी त्यांची सुटका केली. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला आहे.

कोपरखैरणे से. २ येथील तीन मजली विद्याभवन इमारतीत ही दुर्घटना घडली. इमारतीच्या तळमजल्यावरील घरात खासगी शिकवणी चालत होती. गुरुवारी संध्याकाळी या शिकवणीत चौथी, पाचवीचे जवळपास ११ विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी स्लॅब पडून एकाचा मृत्यू झाला.

# पनवेलमधील शेडुंग येथे साकारली अंगणवाडी इमारत

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत पनवेल तालुक्यातील शेडुंग येथे नवीन अंगणवाडी इमारत उभारण्यात आली आहे. सुमारे ११ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या या अंगणवाडीचे उद्घाटन गुरुवारी (दि. ५) भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, भाजप पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, योगेश लहाने, अशोक गायकर, उपसरपंच सुनील पाटील, सुभाष पाटील, रामदास वाघमारे, रामदास खेत्री, निलेश पवार, विठ्ठल दुर्गे, प्रकाश खेत्री, गजानन दुर्गे, कल्पेश गोजे, प्रतीक खेत्री, चेतन गायकर, अविनाश खेत्री, विनोद खेत्री, शिवाजी दुर्गे, रूपेश दुर्गे, अरविंद पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.



यावेळी पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील विविध गावांमध्ये सातत्याने विकासकामे केली जात आहेत. त्यांच्या मार्गदर्शन व प्रयत्नांमुळेच शेडुंग येथील ही अंगणवाडी साकारली आहे.

# एसटीत मद्यपानास 'शून्य सहनशीलता'

## राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

### चालक-वाहकांची अल्कोटेस्ट तपासणी सक्तीची

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) सेवेत असताना मद्यपानास आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे दररोज मद्यपान तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले असून योग्य नोंदी घेऊनच चालकांना कर्तव्यावर पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अशी माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

२५ जानेवारी रोजी मंत्री सरनाईक यांनी मुंबईतील परळ बसस्थानकाला अचानक भेट दिली. यावेळी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये अनेक मद्याच्या बाटल्या आढळून आल्या. तसेच काही कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले. या धक्कादायक प्रकाराची गंभीर दखल घेत मंत्री सरनाईक यांनी तातडीने चौकशी समिती नेमून या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कडक उपाययोजना करण्यासही सांगितले होते. त्याअनुषंगाने एसटी प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजनाही सुचविण्यात आल्या आहेत.

समितीने सुचविलेल्या उपाययोजना तातडीने सर्व आगारांमध्ये लागू



करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. नव्या उपाययोजनांनुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या चालकांची वाहन परीक्षकांच्या माध्यमातून नियमित तपासणी केली जाणार आहे. वाहकांचीही ड्युटी देण्यापूर्वी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे आवश्यक राहणार आहे. चालक व वाहकांची मद्यपान तपासणी झाली आहे की नाही, यावर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, सहाय्यक वाहतूक अधीक्षक, वाहतूक निरीक्षक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि वाहतूक नियंत्रक यांनी देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच आगार व्यवस्थापकांनीही नियमित नियंत्रण ठेवून या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

बस मार्गावर असताना चालकाने नियंत्रण कक्षात लॉगबुकची नोंद करणे बंधनकारक राहणार आहे. चालकाने नोंद केल्यानंतर त्याची पुन्हा एकदा अल्कोटेस्ट तपासणी करून योग्य नोंद घेतल्यानंतरच पुढील मार्गावर पाठविण्याची सक्ती करण्यात आली आहे. ही तपासणी नियमितपणे होत आहे की नाही, याची खात्री स्थानक प्रमुखांनी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय बसस्थानक व आगार परिसरातील चालक, वाहक आणि विश्रांतीगृहांमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांचीही वेळोवेळी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

संबंधित विभागातील पालक अधिकाऱ्यांनी आगार व बसस्थानक भेटीदरम्यान या उपाययोजनांची अंमलबजावणी तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या बाबतीत दक्षता विभागाकडून वेळोवेळी गोपनीय तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. मार्गतपासणी पथक, वाहतूक निरीक्षक, प्रशिक्षण विभाग आणि सुरक्षा विभाग यांच्या माध्यमातून तपासणी कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. यासोबतच अतिथ्यगृह परिसरातील स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, लाईट-पंखे आदी सुविधांची देखभाल करण्याची जबाबदारीही संबंधित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी प्रशासनाने मद्यपानासंदर्भात कठोर भूमिका घेतली असून या उपाययोजनांमुळे बससेवा अधिक सुरक्षित आणि शिस्तबद्ध होईल, असा विश्वास परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

## पेण तालुक्यातील मोठे वढाव येथे सहा लाख ९७ हजारांची घरफोडी

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील मोठे वढाव गावात घरफोडीची घटना घडून सुमारे ६ लाख ९७ हजार ५०० रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केला आहे. या प्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रशेखर विश्वास म्हात्रे (वय ४५) रा. मोठे वढाव, ता. पेण हे ३ मार्च २०२६ रोजी रात्री ८.१५ ते ११.३० दरम्यान कुटुंबासह गावातीलं हरिनाम सप्ताह कार्यक्रमासाठी घराबाहेर गेले होते. याच दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला.

घरातील किचनमधील कपाटाचा लॉक तोडून चोरट्यांनी रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण ६ लाख ९७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

या चोरीमध्ये २,५०० रुपये रोख, सुमारे ५०.७०० मिलीग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठन किंमत अंदाजे ५ लाख ७० हजार रुपये तसेच सुमारे १०.२५० मिलीग्रॅम वजनाचा सोन्याचा हार (किंमत अंदाजे १ लाख २५ हजार रुपये) असा ऐवज चोरीला गेला आहे.

या प्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष जाधव तपास करीत आहेत.

## तळा तालुक्यात आज शिवजयंती सोहळा

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेनेकडून ६ मार्च रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ही शिवजयंती मोठ्या उत्साहात करण्यासाठी शिवसेना तालुका प्रमुख प्रदूम्न ठसाळ, शहर प्रमुख राकेश वडके पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जय्यत तयारी केली आहे.

शिवजयंतीच्या दिवशी सकाळी १०.३० ते २.०० वा. शासकीय रक्तपेढी अलिबाग आणि शिवसेना तळा यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीदेव राधाकृष्ण नामदेव शिंपी समाज मंदिर सभागृह येथे रक्तदान शिबिराचे आयोजन – करण्यात आले आहे. सायं ५ वा. बळीचा नाका येथे शिवशंभू मर्दानी आखाडा आणि लेझीम पथक (विरजोली या. रोहा), सिद्धी भुवड, स्मीता हरी पाटणकर प्रस्तुत मराठी संस्कृतीचा सुरेल नजराणा , संस्कृतीचा वारसा परंपरेचा सोहळा पार पडणार आहे, रात्री ९.वा. गो.म. वेदक विद्यामंदिर पटांगणात लावणी सम्राज्ञी कविता घडशी यांचा आर्केष्ट्रा मराठी वाद्यवृंद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी फलोत्पादन खारभूमी विकासमंत्री ना. भरत गोगावले, अलिबाग मुरूड मतदार संघाचे आ. महेंद्र दळवी, रायगड जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, जिल्हा परिषद सदस्य विकास गोगावले, पक्षाचे जिल्हास्तरीय नेते स्थानिक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.यावेळी विकास कामांचा आढावा व अनेक प्रश्न सोडविण्याविषयी चर्चा करण्यात येणार आहे.

## महिला दिनाचे औचित्य साधून नवजात कन्यारत्नाच्या जन्माचे स्वागत

**खालापूर : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सहज सेवा फाउंडेशन व सहज महिला फाउंडेशनच्या वतीने खोपोली परिसरातील रुग्णालयांमध्ये जन्माला येणाऱ्या कन्यारत्नाचे स्वागत करण्याचा उपक्रम दिनांक ०८ मार्च २०२५ पासून सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत कन्या जन्मल्यावर मातेला अभिनंदन पत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



या उपक्रमाला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत असून दिनांक ०५ मार्च रोजी या उपक्रमातील १०० व्या मातेला सन्मानित करण्याचा मान अजीमुननिशा शाहरुख खान यांना मिळाला आहे. कन्यारत्नाच्या जन्माचे स्वागत करण्याची ही संकल्पना समाजात मुलींबद्दल सकारात्मक भावना निर्माण करण्यासाठी आणि मुलगी हीच घराचे सौभाग्य हा संदेश देण्यासाठी राबविण्यात येत आहे.

आई होणे हा प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण असतो. त्या आनंदात सहभागी होत नवजात बालिकेचे स्वागत करणे, मातेला शुभेच्छा देणे आणि तिच्या मातृत्वाचा सन्मान करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.सहज सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.शेखर जांभळे तसेच सहज महिला फाउंडेशन,खोपोलीच्या अध्यक्षा निलम विलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, या उपक्रमाचे नेतृत्व सागरिका योगिता शेखर जांभळे करत आहेत. समाजात कन्या जन्माचा आनंद साजरा व्हावा आणि मुलींच्या जन्माबद्दल सकारात्मक संदेश जावा, या हेतूने हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे.

आज झालेला १०० वा सन्मान हा या उपक्रमासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून, पुढील काळातही हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे सहज सेवा फाउंडेशनच्या व सहज महिला फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले.

## अल्काईल अमाइन्स कंपनीतर्फे डायलिसिस मशीनचे हस्तांतरण

**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील गरजू रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी अल्काईल अमाइन्स केमिकल्स लिमिटेड पाताळगंगा यांच्या सौजन्याने सी एस आर निधीतुन रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांना अत्याधुनिक डायलिसिस युनिट देण्यात आले. निरामय हॉस्पिटल, रीस येथे हे मशीन रुग्णांच्या सेवेसाठी त्वरित उपलब्ध झालेले आहे.

सी एस आर निधीमार्फत केलेल्या या उपक्रमाचा हस्तांतरण समारंभ दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी रीस येथील निरामय हॉस्पिटल येथे संपन्न झाला. या प्रसंगी अल्काईल अमाइन्सचे सी एच आर ओ उदय घाग आणि सिनियर मॅनेजर एच आर यांनी हे मशीन रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा



आणि निरामय हॉस्पिटल यांना त्वरित सेवेसाठी हस्तांतरित केले.

या प्रसंगी त्यांनी अल्काईल अमाइन्सच्या सी एस आर निधिवाटपाच्या नियंत्रणाबाबत माहिती दिली आणि अशाच प्रकारच्या सहकार्याची ग्वाही दिली .

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष विजय पाटील, सचिव वर्तक आणि रोटरियन तसेच निरामय हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ.संजय कुरंगळे आणि त्यांचे सहकारी, मुख्य समन्वयक डॉ पद्माकर मते , अल्काईल अमाइन्सच्या पाताळगंगा युनिटच्या एच आर अर्चना माने, सिनियर सी एस आर अधिकारी निकिता म्हात्रे, सी एस आर कन्सल्टंट रवी ओंकार, तसेच मोहोपाडा ग्रामपंचायत सरपंच उमाताई मुंढे, जिल्हा परिषद समिती सदस्य कृष्णाशेठ पारंगे आणि इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत हा समारंभ झाला.

या परिसरातील रुग्णांना या उपलब्ध सेवेमुळे दिलासा मिळाला आहे. सर्व मान्यवरांनी आणि परिसरातील रहिवाश्यांनी अल्काईल अमाइन्सच्या या अभिनव उपक्रमाबद्दल परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## साळावच्या जेएसडब्लू कंपनीत राष्ट्रीय सुरक्षा दिन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

राष्ट्रीय सुरक्षा दिन ४ मार्च या दिवशी साजरा करण्यात येतो, त्यानिमित्ताने साळाव जेएसडब्ल कंपनीत ५५ वा राष्ट्रीय सुरक्षा दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास साळाव जेएसडब्लू कंपनीचे व्यवस्थापक प्लॅन्ट हेड पंकज मलिक यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच साळाव अग्नीक्षामक दलाचे योगेश वासनिक, जितेंद्र आचार्य, प्रफुल्ला म्हात्रे तसेच साळाव जेएसडब्लू कर्मचारीवर्ग यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन अग्नीक्षामक दलाचे योगेश वासनिक यांचे मार्गदर्शनाखाली सुरक्षा कर्मचारी यांनी केले.



प्रारंभी कंपनी हेड पंकज मलिक यांचे हस्ते दिपप्रज्वलन तसेच सुरक्षा ध्वजाचे अनावरण करण्यात आले, त्यानंतर साळाव कर्मचारीवर्गास सुरक्षा शपथ देण्यात आली. यावेळी साळाव अग्नीक्षामक दलाचे योगेश वासनिक यांनी प्रमुख अतिथी कंपनी हेड पंकज मलिक यांचे स्वागत पुष्पगूच्छ प्रदान करून केले. या राष्ट्रीय सुरक्षा दिनाचे औचित्याने विविध स्पर्धेचे आयोजन साळाव जेएसडब्लू कंपनी अंतर्गत घेण्यात आले होते, तसेच अग्नीक्षामक दलाचे सामुग्रीचे प्रदर्शनसुध्दा ठेवण्यात आले होते. यावेळी कंपनी हेड पंकज मलिक यांनी उपस्थितांना सुरक्षते संदर्भात मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन योगेश वासनिक यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रफुल्ल म्हात्रे यांनी व्यक्त केले.

## रहाटाडवाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे सुयश

**तळा : प्रतिनिधी**

शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा या महाराष्ट्र राज्य शासनाने केलेल्या मूल्यांकना राज्यातून १०२६७५ शाळातून ४२९ शाळांना अ प्लस श्रेणी प्राप्त झाली असून त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील दहा शाळांना 'अ ' प्लस श्रेणी प्राप्त झाली आहे. त्यामध्ये तळा तालुक्यातून प्राथमिक विभागातून एकमेव रायगड जिल्हा परिषद शाळा राहाटाडवाडी या शाळेने अ प्लस श्रेणी प्राप्त केली.

हि शाळा संपूर्ण डिजिटल असून या शाळेसाठी मेहनत घेणारे शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ रहाटाडवाडी, मुंबईकर मंडळ रहाटाडवाडी, महिला मंडळ, ग्रामस्थ मंडळ रहाटाडवाडी, अंगणवाडी ताई या सर्वांच्या सहकार्याने व मेहनतीने हे यश मिळवणे शक्य झाले असे मुख्याध्यापक रविंद्र म्हात्रे यांनी सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र म्हात्रे हे एकच शिक्षक असून देखील त्यांनी शाळेच्या प्रगतीमध्ये कुठल्याही प्रकारचा अडथळा न येऊ देता शाळेचा स्कॉप मूल्यांकनात राज्यात अ प्लस ही श्रेणी संपादीत केली आहे.त्यांना मिळालेल्या यशाबद्दल सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.



## जागतिक महिला दिनानिमित्त बचत गटांच्या वस्तूंचे विक्री प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्यावतीने बचत गटांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तुंचे विक्री व प्रदर्शनाचे उदघाट्न दिनांक ७ मार्च रोजी ११:०० वाजता उप महापौर प्रमिला पाटील यांच्या हस्ते आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये होणार आहे. तरी महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी या मोठ्या संख्येने भेट द्यावी असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.


पनवेल महापालिका क्षेत्रातील महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवण्यासाठी, व्यवसायिक व सामाजिक कौशल्य वाढविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत महापालिका कार्यक्षेत्रातील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी महापौर नितिन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली बचत गटाने उत्पादित केलेल्या विविध वस्तुंचे विक्री व प्रदर्शन शनिवार, रविवार सोमवार तीन दिवस आयोजित करण्यात आले आहे.

या बचत गटाच्या उत्पादन मेळाव्यामध्ये खाद्यपदार्थ, दागिने, लोकरीच्या वस्तू, मोत्याच्या वस्तू, बेडशीट, कपडे, साड्या अशा विविध वस्तूंची विक्री करण्यात येणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनास भेट द्यावी असे आवाहन अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे केले आहे.

### दुखवटा

#### गोटीराम दाभणे

**पनवेल :** तालुक्यातील पाले खुर्द येथील गोटीराम दाभणे यांचे शुक्रवार दिनांक २७ निधन झाले मृत्यू समयी ते ७३ वर्षाचे होते त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा तीन मुलगी नातवंडे



असा परिवार आहे कै गोटीराम दाभणे यांचे दक्ष क्रिया विधी रविवार दि ८/३/२०२६ ,श्री नाशिक येथे होणार आहे तरी त्यांचे उत्तर कार्य तेरावे बुधवार दिनांक ११/३/२०२६ रोजी राहत्या घरी पाले खुर्द येथे होणार आहे

## खालापुरात गॅस पाईपच्या स्फोटात एकाचा भाजून मृत्यू

**मोहोपाडा :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील लोहोप येथील विठोबा कंपनी, प्लॉट नं.५६/१६ लोहोप गाव, तालुका खालापूर येथे ॲल्युनिमिनय गॅस पाईपच्या स्फोटाने एकाचा भाजून मृत्यू झाल्याची घटना घडली असून रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सुनिलकुमार बिदा सिंग (वय ४१) हा रात्रपाळीस ड्युटीस असताना कंपनीत २ वाजता ॲल्युनिमिनय गॅस पाईपच्या स्फोट झाल्याने सुनिलकुमार बिदा सिंग हे जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरिता नेले असताना अश्विनी हॉस्पिटल कोपरखैरणे येथे उपचार घेत असताना सुनिलकुमार यास मृत घोषित केले.

## अलिबाग प्रेस असोसिएशनचे तेजस्विनी पुरस्कार जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांना तेजस्विनी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. २०२६चे तेजस्विनी पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. वंदना विजय सुर्वे, देविका देवेंद्र पाबेकर,सारा अभिजित वर्तक, प्राची विवेक देवळे, प्रियांका अमोल घरत यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

शनिवारी (दि. ७) सकाळी १० वाजता जंजिरा सभागृह, पोलीस परेड मैदान, रायगड पोलीस मुख्यालय,



प्राची विवेक देवळे | देविका देवेंद्र पाबेकर | प्रियांका अमोल घरत | वंदना विजय सुर्वे | सारा अभिजित वर्तक

अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या समारंभात तेजस्विनी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल, रायगड जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील , रायगड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# महिलांसाठी युद्धकला प्राथमिक प्रशिक्षण शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने भाजप महिला मोर्चाच्या पनवेल शहराध्यक्ष तथा नगरसेविका रुचिता लोंढे यांच्या पुढाकारातून महिलांसाठी प्राचीन युद्धकला प्राथमिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

पनवेल शहरातील लोकनेते दि.बा पाटील शाळेच्या मैदानावर हे शिबिर सुरू झाले असून ४ ते ११ मार्च या सात दिवसांच्या कालावधीत हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे शिबिर विशेषतः मुली आणि महिलांसाठी आयोजित करण्यात आले असून दहा वर्षांवरील मुलींना सहभागी होता येणार आहे. बुधवारी या प्रशिक्षण शिबिराची सुरुवात झाली.





नगरसेविका रूचिता लोंढे यांचा पनवेलमध्ये उपक्रम

यावेळी नगरसेवक राजू सोनी, सामाजिक कार्यकर्त्या स्मिता खरे, पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत, कविता ठाकूर, संदीप लोंढे, प्रांजल काने, आदिती ओझे, चिन्मय समेळ यांच्यासह महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी बोलताना नगरसेविका रूचिता लोंढे म्हणाल्या की, महिलांनी स्वतःच्या सुरक्षेसाठी सक्षम होणे अत्यंत गरजेचे आहे. महिलांना स्वसंरक्षणाचे धडे मिळावेत आणि आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने गेल्या तीन वर्षांपासून या प्राचीन युद्धकला प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले जात आहे.

महिलांनी कोणत्याही परिस्थितीत धैर्याने उभे राहण्यासाठी अशा प्रशिक्षणाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले, तर सामाजिक कार्यकर्त्या स्मिता खरे यांनी रूचिता लोंढे यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत महिलांच्या सक्षमीकरणासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले. या प्रशिक्षण शिबिराला महिला व मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## खांदा कॉलनीत विहिरीत पडून उंटांचा दुर्दैवी मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

खांदा कॉलनी सेक्टर १४ मधील हॉरिझन स्कूल परिसरात एका विहिरीत उंट पडल्याची घटना घडली. याबाबत प्रथमेश भुजबळ यांनी नवीन पनवेल अग्निशमन केंद्राच्या कंट्रोल रूमला माहिती दिली.

सकाळच्या सुमारास वर्दी मिळताच अग्निशमन दलाचे वाहन कर्मचाऱ्यांसह तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी पोहचल्यानंतर जमीन सपाटीवरील विहिरीमध्ये उंट पडल्याचे निदर्शनास आले. उंटाला बाहेर काढण्यासाठी हायड्रा आणि जेसीबीच्या सहाय्याने प्रयत्न करण्यात आले, मात्र, तोपर्यंत उंटाचा मृत्यू झाल्याची माहिती पोलीस पंचनाम्यातून मिळाली. मृत उंटाचा मालक करण रमेश शिंदे असल्याची माहिती समोर आली आहे.

कारवाईदरम्यान अग्निशमन उपअधिकारी अतुल सपकाळ, प्रमुख अग्निशामक विमोचक विकास पालवे, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे तसेच एएसआय ढोबळे आदी उपस्थित होते.

## हिंद दी चादर कार्यक्रमात पनवेल मनपाकडून रूग्णसेवा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरात आयोजित करण्यात आलेल्या श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५०व्या शहिदी समागमानिमित्त हिंद दी चादर या विशेष कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या भाविकांसाठी पनवेल महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने विविध सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये एकुण २५ हजार २४० रुग्णांनी विविध सुविधांचा लाभ घेतला.



पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाच्या माध्यमातून कार्यक्रमस्थळी २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी भाविकांच्या आरोग्य सेवेसाठी उत्तम अशी व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये कार्यक्रम स्थळी पाच बीएलएस रूग्णवाहिका, तीन एएलएस अद्ययावत रूग्णवाहिका तैनात आहेत. वैद्यकिय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर्स फार्मासिस्ट, परिचारिका, वॉर्डबॉय यांच्यासहित एकुण ८५० पेक्षा अधिक वैद्यकिय आरोग्य कर्मचारी कार्यरत होते.

महापालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी यांच्या टिमने ही कामगिरी पार पाडली.

## आरटीओच्या तत्परतेमुळे रस्त्यावरील अपघात टळला

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळे मुंबई-गोवा महामार्गावर संभाव्य अपघात टळला. रस्त्यावर सांडलेल्या तेलामुळे घसरून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती, मात्र वेळेत उचललेल्या उपाययोजनांमुळे पुढील अनर्थ टळल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

महामार्गावरील मुंबई-गोवा जेएसडब्ल्यू कंटेनर यार्डसमोर पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाकडून वाहन तपासणी मोहीम सुरू होती. त्याचदरम्यान काही अंतरावर रस्त्यावर मोठी गर्दी जमल्याचे निदर्शनास आले. मोटार वाहन निरीक्षक संदीप कोटकर यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असता, रस्त्यावर सांडलेल्या तेलामुळे दोन मोटरसायकल घसरून अपघात झाल्याचे आढळले. सुमारे दीडशे मीटर अंतरावर एका वाहनातून तेल सांडल्यामुळे रस्ता निसरडा झाला होता. कोटकर यांनी तातडीने वाहतूक थांबवली आणि अग्निशामक केंद्राला माहिती दिली.

पुढील अपघात टाळण्यासाठी रस्त्याच्या कडेला असलेली माती रस्त्यावर टाकली. या पथकातील चालक येरलापल्ली आणि पांडुरंग माळी यांनी तत्परतेने माती टाकण्याचे काम हाती घेतले. त्यांना उपस्थित नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे मदत केली.

## पनवेल महापालिकेचे मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना मालमत्ता कर भरण्याबाबत महानगरपालिकेच्या कर विभागामार्फत जाहीर आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सर्व मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरणे बंधनकारक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महानगरपालिकेच्या विकास कामांसाठी व नागरी सुविधा सुरळीत पुरविण्यासाठी कर वसुली अत्यंत आवश्यक असल्याने थकबाकीदारांनी तात्काळ कराची थकबाकी भरावी, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. मालमत्ता कराच्या थकीत रकमेचा संपूर्ण भरणा दिनांक १० मार्च २०२६ पर्यंत करावा, तसेच थकबाकी न भरल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२८, १२९ तसेच करनिर्धारण नियमांनुसार दंड, जप्ती, अटॅचमेंट व इतर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ज्या मालमत्ता धारकांना अद्याप कराची देयके प्राप्त झाली नसतील त्यांनी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर panvelmc.org किंवा KARMITRA PMC - APP वर नोंदणी करून ऑनलाईन पद्धतीने देयक प्राप्त करून कर भरणा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ऑनलाईन पद्धतीने कर भरल्यास २ टक्के सवलत देण्यात येणार आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी मार्च २०२६ महिन्यातील सर्व शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशीही कर संकलन कार्यालय सुरू राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे

पनवेल महानगरपालिकेच्या विकास कामांना हातभार लावण्यासाठी सर्व मालमत्ता धारकांनी वेळेत मालमत्ता कर भरावा, असे आवाहन उपायुक्त (कर) स्वरूप खारगे यांनी केले आहे.

## खारघरमध्ये लाखोंचे अमली पदार्थ जप्त

**पनवेल : वार्ताहर**

खारघर परिसरात अमली पदार्थविरोधी कक्षाने धडक कारवाई करत आठ लाखांच्या अमली पदार्थांसह दोघांना अटक केली आहे. ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी दोन संशयितांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर सेक्टर-२१ मधील सम्राट अशोक इमारतीमध्ये राहणारे दोन व्यक्ती राहत्या घरात अमली पदार्थांचा साठा करून त्याची विक्री करत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप निगडे व त्यांच्या पथकाने इमारतीमधील संशयित घरावर छापा मारला. घराची झडती घेतली असता संशयित आरोपी ऋषिकेश जितेंद्र मिश्रा (वय २१) याच्या ताब्यातून विविध प्रकारचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले.

चार लाख ४२ हजारांचा ४४.२६ ग्रॅम हायड्रो गांजा, दोन लाख ३७ हजारांचा ६.७९ ग्रॅम मेफेड्रोन आणि एक लाख २६ हजारांच्या ३.१७ग्रॅमच्या एमडीएमएच्या एकूण सात गोळ्या असा एकूण आठ लाख सात हजारांच्या अमली पदार्थाचा समावेश आहे.

चौकशीत हा पोलिसांच्या अमली पदार्थ खारघर सेक्टर-१२ येथील एकता ॲव्हेन्यू बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या केतन संतोष यादव (वय २१) याच्याकडून आणल्याची माहिती समोर आली. त्यानुसार पोलिसांनी केतनलाही अटक केली आहे.

## महापौर नितीन पाटील यांची सामाजिक मागण्यासंदर्भात बैठक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना भेडसावणाऱ्या सामाजिक समस्यांबाबत प्रहार जनशक्ती पक्ष, अन्याय अत्याचार निर्मूलन समिती आणि आदिवाशी विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने नागरी समस्याबाबत पालिका मुख्यालयावर गेल्या आठवड्यात ठिय्या आंदोलन करण्यात आले, या आंदोलनाची दखल घेत महापौर नितीन पाटील यांनी नागरी समस्या सोडवण्यासाठी आंदोलनकर्ते व पालिका प्रशासन यांच्या सोबत बैठक घेण्यात आली.



या बैठकीत महापौर यांनी सर्व विषय समजून त्यावर तोडगा काढण्याचे आश्वासन देत पालिका प्रशासन यांना कारवाई करण्याचे निर्देश दिले. महासभेत ठराव मंजूर करून शासनाकडे प्रस्ताव सादर केला जाईल असे सांगितले व सर्व प्रलंबित मागण्याच्या अनुषंगाने आढावा घेवून त्यावर नियमानुसार कार्यवाही केली जाईल असे सांगितले.

या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली व मागण्या रास्त असल्याने तातडीने उपाययोजना कराव्यात असे निर्देश प्रशासनाला दिले अशी माहिती सुनील शिरीषकर, जिल्हा उपाध्यक्ष रायगड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. ही बैठक महापौर यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती व ही बैठक महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली व प्रशासनाच्या वतीने गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त उपस्थित होते, तसेच या बैठकीत प्रहार जनशक्ती पक्षाचे राज्य प्रवक्ते मनोज टेकाडे, प्रहारचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुनील शिरीषकर, अन्याय अत्याचार निर्मूलन समिती अध्यक्ष, संतोष चालके, परेश लोंढे, अजय कदम, राहुल तेलंग आणि पंकज मोहिते उपस्थित होते.

पालिकेचे सार्वजनिक सुविधायुक्त रुग्णालय बांधणे, सार्वजनिक परिवहन सेवा सुरू करणे, आदिवासी वाघऱ्याचीवाडी इथे पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, हवा प्रदूषण करणाऱ्या विकासकांवर कारवाई करणे, कंट्राटी कामगारांना सर्व सुविधा देणे, अनाधिकृत आणि बेकायदेशीर फेरीवाले यांच्यावर कारवाई करणे आदी मागण्यासाठी चर्चा करण्यात आली. महापौर यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे नागरी प्रश्ना संदर्भात कारवाई न झाल्यास पुढील आंदोलन प्रहार स्टाइलने होईल असा इशारा सुनील शिरीषकर, जिल्हा उपाध्यक्ष रायगड यांनी दिला.





**पनवेल : तुकाराम बीजनिमित्त कोपर गावातील मंदिरात जाऊन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत यांनी दर्शन घेतले. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.**



**उरण : येथील नगर परिषदचे पाणीपुरवठा सभापती राजेश ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त भाजप शहराध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, उपनगराध्यक्ष तथा बांधकाम सभापती रवि भोईर, आरोग्य सभापती जसिम गॅस, नगरसेवक गणेश पाटील, युवा मोर्चा शहराध्यक्ष निलेश पाटील, मनन पटेल, हितेश पटेल, सूरज ठवळे, मदन कोळी, विनायक कोळी, निखील माळी, स्वप्नील मयेकर, माजी नगरसेवक राजेश कोळी, सागर नाखवा, सतेज पाटील, विनोद पुगावकर, दिपेश कोळी, रोहित कोळी, चेतन कोळी आदींनी शुभेच्छा दिल्या.**

## भाजपच्या विनोद घरत यांचा प्रभाग ३मध्ये पाहणी दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर पनवेल सरचिटणीस विनोद घरत यांनी पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक ३मध्ये पाहणी दौरा केला. या दौऱ्यात ओवेगाव, ओवेकॅम्प, खुटुकबांधन, पापडीचा पाडा, तळोजा पाचनंद, रांजणपाडा आणि पेठगाव येथील सर्व स्मशानभूमींची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

स्मशानभूमींमध्ये आवश्यक असलेल्या सुविधांची माहिती घेऊन या ठिकाणांची कामे पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. या पाहणी दौऱ्यात उत्तर रायगड वारकरी संप्रदायाचे अध्यक्ष मोहन म्हात्रे, उत्तर पनवेल उपाध्यक्ष प्रभाकर जोशी, भाजप प्रभाग क्र. ३चे अध्यक्ष जगदीश घरत, कन्सल्टंट रणजित शिराळ, नितीन म्हात्रे, केशव गायकर, माणिक म्हात्रे, रवी मोडावकर, प्रवीण घरत, संतोष भातोसे आणि रोशन घरत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## एचडीएफसी बँकेच्या नवीन शाखेचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील ठाणा नाका येथे एचडीएफसी बँकेच्या नवीन शाखेचे उद्घाटन गुरुवारी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

महापौर नितीन पाटील म्हणाले की, आजच्या स्पर्धेच्या युगात ग्राहकांना चांगली सेवा देणे आणि त्यांचा विश्वास टिकवून ठेवणे हे बँकांसाठी सर्वात महत्त्वाचे आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीत ग्राहकांच्या गरजा ओळखून आधुनिक सेवा देणाऱ्या बँकाच पुढे जाऊ शकतात. अशा बँकांमध्ये एचडीएफसी बँकेचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते, असेही त्यांनी सांगितले. एचडीएफसी बँकेने ग्राहकांना उत्कृष्ट आणि विश्वासार्ह सेवा दिल्यामुळेच आज ती देशातील अग्रगण्य बँकांपैकी एक बनली आहे. पनवेलमधील ही नवीन शाखा शहरातील नागरिकांना अधिक चांगल्या बँकिंग सुविधा उपलब्ध करून देईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल भगत, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेवक दशरथ म्हात्रे, अमोल माने, गणेश सापकळ, जॉयदीप मित्रा, कार्तिक अंजारिया, गणेश अय्यर तसेच अमित मित्तल आदी उपस्थित होते.

## होळीनिमित्त पोळीदान उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**उरण : प्रतिनिधी**

खारपाडा गावात यंदा होळीनिमित्ताने रमाकांत घरत यांनी ग्रामस्थांना आवाहन करत, होळीला नैवेद्य म्हणून अर्पण केल्या जाणाऱ्या पोळ्या व इतर खाद्यपदार्थ होळीत जाळण्याऐवजी ते दुर्बल घटकातील लहानग्या गरीब बालकांना दान करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी गावकऱ्यांना केले होते.

अन्न वाया न जाता अन्नदान करू या असा संदेश देत गावाच्या मुख्य होळी ठिकाणी पोळ्या जमा करण्यासाठी विशेष बॉक्स ठेवण्यात आला होता. जमा झालेल्या पोळ्या गरजूंपर्यंत पोहचविण्यात येतील, असा फलकही लावण्यात आला होता. या आवाह नाला खारपाडा ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. होळीच्या दिवशी ग्रामस्थ भगिनींनी प्रसादासाठी आणलेल्या पुरणपोळ्या मोठ्या प्रमाणात एकत्रित जमा करून गरजू बांधवांपर्यंत पोहचविण्यात आल्या.

ग्रामस्थांचे सहकार्य तसेच अनिसचे संदेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनामुळे हा सामाजिक उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. भविष्यातही अशाच सामाजिक उपक्रमांना ग्रामस्थांचा उत्स्फूर्त पाठिंबा लाभावा, अशी अपेक्षा रमाकांत घरत यांनी व्यक्त केली.



## संपादकीय

# अखेर बिनविरोधच

राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीची घोषणा झाली असून येत्या १६ तारखेला ही निवडणूक होणार आहे. यात महाराष्ट्रातील सर्वाधिक सात जागा रिक्त होणार आहेत. परंतु राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी गुरुवारी राज्यातील सात जागांसाठीची ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे अखेर स्पष्ट झाले. महाराष्ट्रातील 'बिनविरोध'च्या या ट्विस्टसोबतच बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी राज्यसभेसाठी अर्ज दाखल करणे गुरुवारी देशभराचे लक्ष वेधून गेले.

**राज्यसभेच्या निवडणुकीसाठी राज्यात भारतीय जनता पक्षाकडून चार, राष्ट्रवादीकडून एक आणि शिवसेनेकडून एक असे सहा अर्ज दाखल झाले. तर दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडीकडून ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा अर्ज दाखल झाला आणि त्यांच्या उमेदवारीमुळेच ही निवडणूक बिनविरोध झाल्याचे स्पष्ट झाले. या निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शिवसेना पक्ष दोन उमेदवार देईल अशी चर्चा होती. परंतु शिंदे यांच्या शिवसेनेने अखेर एकच उमेदवार दिला. ज्योती वाघमारे यांनी शिवसेनेतर्फे अर्ज सादर केला. अशातऱ्हेने राज्यातील सात जागांसाठी अखेर सातच अर्ज दाखल झाल्याने महाराष्ट्रातील राज्यसभेसाठीची निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले. भारतीय जनता पक्षाकडून मंगळवारी सहा राज्यांतील नऊ उमेदवारांची घोषणा करण्यात आली तर बुधवारी महाराष्ट्रातील चार उमेदवारांची नावे जाहीर झाली. रामदास आठवले, विनोद तावडे, माया इवनाते आणि रामराव वडकुते यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाने पार्थ पवार यांना उमेदवारी दिली. महाविकास आघाडीच्या वाट्याला येणारी एकमेव जागा उबाठा गटाला मिळावी यासाठी आदित्य ठाकरे आग्रही होते. त्याचवेळी राष्ट्रवादीकडून शरद पवार यांचे नाव पुढे आले. काँग्रेसच्या नेत्यांनी शरद पवार यांच्या नावाला पाठिंबा दिल्याने महाविकास आघाडीकडून शरद पवार यांचेच नाव अंतिम झाले असे सांगितले जाते. यंदाच्या राज्यसभेच्या या निवडणुकीत बिहारचे मुख्यमंत्री व संयुक्त जनता दलाचे (जेडीयू) सर्वेसर्वा नितीशकुमार यांनी गुरुवारी अर्ज दाखल केल्याने त्यांचा बिहारचे मुख्यमंत्रीपद सोडण्याचा निर्णय ही देशभराचे लक्ष वेधून घेणारी घडामोड ठरली आहे. गेल्या दोन दशकांच्या काळात नितीशकुमार यांनी तब्बल दहा वेळा बिहारचे मुख्यमंत्रीपद भूषवले आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीतही भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या यशात नितीशकुमार यांचे योगदान मोठे आहे हे मान्य करावे लागेल. या निवडणुकीपाठोपाठ आता १ मार्चला नितीशकुमार यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली असून त्यांच्या तब्येतीचा मुद्दा त्यांच्या या निर्णयामागे असल्याचे सांगितले जाते. स्वत: नितीशकुमार यांनी मात्र, बिहारच्या दोन्ही सभागृहांसह लोकसभा व राज्यसभेचेही सदस्य व्हावे अशी आपली संसदीय कारकीर्दीच्या सुरुवातीपासूनच इच्छा असल्याने हा निर्णय घेतल्याचे समाजमाध्यमांवर म्हटले आहे. अर्थात, त्यांच्यानंतर बिहारचे मुख्यमंत्रीपद कुणाकडे जाणार तसेच जेडीयूचा बिहारमधील उत्तराधिकारी कोण असणार हे प्रश्न यातून समोर आले आहेत. नितीशकुमार यांचे पुत्र निशांतकुमार राजकारणात उतरले असले तरी अनुभवाच्या अभावी त्यांच्यासाठी जदयुचे नेतृत्व आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे. अर्थात नितीशकुमार दिल्लीतूनही बिहारकडे लक्ष ठेवतीलच. राज्यसभेत दाखल झाल्यावर नितीशकुमार यांच्याकडे दिल्लीत कोणती जबाबदारी सोपवली जाते याविषयीही सगळ्यांना उत्सुकता आहे. भाजपचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन हेही बिहारचे असून तेही आता राज्यसभेत दाखल होणार आहेत.**

# टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आकर्षण वाढतंय



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

क्रीडा क्षेत्रात रायगड जिल्ह्याची ओळख कबड्डीची पंढरी अशी आहे. जिल्ह्यातील अनेक गावात कबड्डीचा संघ आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक कबड्डी संघ असलेला रायगड जिल्हा आहे. या जिल्ह्यात दर शनिवार-रविवारी कबड्डीची स्पर्धा आयोजित केली जाते, परंतु आता परिस्थिती हळुहळू बदलू लागली आहे. कबड्डीऐवजी टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांची संख्या वाढू लागली आहे.

रायगडच्या ग्रामीण भागातदेखील तरुणांमध्ये टेनिस क्रिकेटचे आकर्षण वाढू लागले आहे. ज्या गावांमध्ये कबड्डी स्पर्धा व्हायच्या त्या गावांमध्ये आता टेनिस बॉलच्या क्रिकेट स्पर्धा होत आहेत. ऑक्टोबर महिन्यापासून हा क्रिकेटचा हंगाम सुरू होतो. प्रत्येक हंगामात कोट्यवधी रुपयांची उलाढाल या टेनिसबॉल क्रिकेट स्पार्धांमधून होते. खेळाडूंना पैसे मिळतात ही एक जमेची बाजू असली तरी या स्पर्धांवर कुणाचे नियंत्रण नसते. त्यामुळे विस्कळीतपणा असतो.

पूर्वी उरण, पनवेल या तालुक्यांमध्ये टेनिस बॉल नाईट क्रिकेट स्पर्धा जास्त होत असत. आता प्रत्येक तालुक्यात या स्पर्धा होत आहेत. टेनिस बॉल नाईट क्रिकेट स्पार्धा घेण्यात विरोध असण्याचे कारण नाही, परंतु त्यावर नियंत्रण मात्र हवे. प्रत्येक मोसमात या स्पर्धांमधून करोडो रूपयांची उलाढाल होते. त्यामुळे टेनिस क्रिकेट खेळणाऱ्या गावखेड्यातील खेळाडूंना पैसे मिळत आहेत. स्पर्धांचे आयोजन भव्य-दिव्य असते. भविष्यातीत टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांचे प्रमाण वाढणार आहे. त्यामुळे यांच्यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा प्रत्येक जिल्ह्यात असली पाहिजे.

रायगड जिल्हा हा कबड्डीची पंढरी म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात पूर्वी दर रविवारी कबड्डी स्पर्धा होत असे. कबड्डी स्पर्धा असली की त्या गावात उत्सवाचे वातावरण असायचे. गावातील प्रत्येक घरावर एका संघाची जबाबदारी असायची. ही परिस्थिती आता बदलतेय. जिल्ह्यात अगदी पेण आणि अलिबाग या दोन तालुक्यांमध्येही टेनिस क्रिकेटचे प्रमाण वाढले आहे. ज्या गावांमध्ये पूर्वी रात्री तरुण कबड्डीचा सराव करीत असत त्या गावांमध्येदेखील परिस्थिती बदलत आहे.

रायगडात गावोगावी टेनि बॉल क्रिकेट स्पर्धांचे आयोजन आता केले जात आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून भव्य चषक आणि लाखो रुपयांची बक्षिसे दिली जातात. कार, मोटरसायकल अशी वैयक्तिक पारितोषिकेसुद्धा दिली जात आहेत. पूर्वी क्रिकेट स्पर्धा दिवसा होत असत. आता रात्री विद्युत प्रकाशझोतात क्रिकेट स्पर्धा खेळविण्याचे प्रमाण वाढले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हे या स्पर्धांचे वैशिष्ट्य ठरत आहे. आयपीएलच्या धर्तीवर निरनिराळ्या संघाची निवड करून भव्य क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले जात आहे. भले मोठे क्रीडांगण, प्रेक्षक गॅलरी, स्पर्धेचे थेट प्रक्षेपण, रिव्ह्यू घेण्याची सुविधा अशा सुविधा जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये प्रथमच उपलब्ध करून देण्यात येत आहेत. रात्रंदिवस चालणाऱ्या या स्पर्धांना खेळाडू आणि प्रेक्षकांचाही उंदड प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. हा खेळ आता लोकप्रिय होऊ लागलाय.

पूर्वी अलिबागमध्ये क्रीडाभुवनतर्फे २९ ते ३१ डिसेंबर या कालावधीत टेनिस बॉल नाईट क्रिकेट स्पर्धा आयोजित केली जायची. ही स्पर्धा मानाची मानली जायची. खेळाडू या स्पर्धेची वाट पहायचे. ती स्पर्धा बंद झाली, तरी इतर स्पर्धा मात्र वाढल्या आहेत. अलिबागमध्ये प्रशांत नाईक मित्र मंडळाची क्रिकेट लीग स्पर्धा होते. माजी आमदार स्व. मधुकर ठाकूर यांच्या कुटूंबाच्या वतीनेही माजी आमदार स्व. मधुकर ठाकूर (पप्पा) चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले जाते. शेतकरी कामगार पक्ष आणि पुरोगामी युवक संघटनेतर्फे पीएनपी चषक क्रिकेट स्पर्धा होते. साई क्रीडा मंडळाच्या वतीने झिराड येथे अलिबाग प्रिमिअर लीग स्पर्धेचे आयोजन केले जाते.

आमदार महेंद्र दळवी आमदार चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करतात. या स्पर्धांमध्ये लाखो रुपयांची बक्षिसे दिली जातात. या केवळ अलिबाग तालुक्यतील मोजक्या क्रिकेट स्पर्धा आहेत. पनवेल, उरण, पेण तसेच अन्य तालुक्यांमध्येही अशा स्पर्धा होत असतात, ज्यामध्येदेखील लाखो रुपयांची बक्षिसे दिली जातात.


नाईट क्रिकेट स्पर्धा होताच; त्याचबबरोबर दिवसा खेळवल्या जाणाऱ्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांची संख्यादेखील वाढत आहे. या स्पर्धांच्या आयोजनामुळे स्थानिक खेळाडूंना आपली चुणूक दाखवण्याची संधी तर मिळतेच आहे. त्याचबरोबर ज्या संघातून खेळाडू खेळत आहेत त्या संघव्यवस्थापनाकडून त्यांना चांगला मोबदलाही दिला जातो आहे. त्यामुळे या खेळाकडे तरुण पिढी आकर्षित होत आहे. या स्पर्धांमध्ये लाखो रूपयांची बक्षीसे दिली जातात, हे जरी खरे असले तरी या स्पर्धांमध्ये विस्कळीतपणा असतो. या स्पर्धावर कुणाचे नियंत्रण नसते. स्पर्धा आयोजनासाठी कुणाची परवानगी घ्यावी लागत नाही. आयोजक ठरवतील ते प्रवेश शुल्क. प्रत्येक स्पर्धेचे नियम वेगळे असतात. भविष्यात टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा वाढणार आहेत. लेदर बॉलप्रमाणे टेनिस बॉलच्या राष्ट्रीय स्पर्धा होतील. त्यासाठी राज्याचा संघ निवडावा लागेल, जिल्ह्याचा संघ निवडावा लागेल. भविष्याचा विचार करता टेनिस बॉल क्रिकेटवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा राज्यात व प्रत्येक जिल्ह्यात उभी करावी लागेल.



## बदलते तंत्रज्ञान

# ॲपलचा स्वस्त स्मार्टफोन आयफोन १७ इ भारतात लॉन्च

टेक कंपनी ॲपलने २ मार्च रोजी भारत आणि जागतिक बाजारपेठेत आपल्या अपडेटेड १७ सिरीजमधील सर्वात स्वस्त फोन आयफोन १७इ लॉन्च केला आहे. आयफोन १६इ च्या तुलनेत यात अनेक अपडेट्स करण्यात आले आहेत, जसे की ए लेटेस्ट ए१९ चिप-सेट, ४८एमपी फ्यूजन कॅमेरा, उत्तम टिकाऊपणा, मॅगसेफ सपोर्ट आणि बेस व्हेरिएंटमध्ये स्टोरेज दुप्पट म्हणजे २५६जीबीकरण्यात आले आहे.



आयफोन १७इ च्या फ्रंटमध्ये सिरॅमिक शील्ड २ चा वापर करण्यात आला आहे, जे स्क्रॅचपासून ३ पट जास्त संरक्षण देते. बॅक पॅनलवर मॅट टेक्सचर देण्यात आले आहे, ज्यामुळे हातात पकडल्यावर ते निसटत नाही. यात जुन्या मॉडेलप्रमाणेच 'नॉच' डिझाइन कायम ठेवण्यात आले आहे.

फोनमध्ये शॉर्टकट्ससाठी खास ॲक्शन बटन देण्यात आले आहे. चार्जिंगसाठी यात युएसबी टाइप-सी पोर्ट मिळते. हे ३ रंगांमध्ये - सॉफ्ट पिंक, व्हाईट आणि ब्लॅकमध्ये उपलब्ध असेल.

सॉफ्टवेअर: हे नवीनतम iOS २६ वर चालते, ज्यात कॉल स्क्रीनिंग आणि लाइव्ह ट्रान्सलेशन यांसारखे 'ॲपल इंटेलिजन्स' फीचर्स दिले आहेत.

याव्यतिरिक्त, कंपनीने अपडेटेड एम ४ प्रोसेसरसह नवीन आयपॅड एअर देखील सादर केले, जे मागील जनरेशनच्या तुलनेत ३०% वेगवान आहे. आयफोन १७श आणि आयपॅड एअरची सुरुवातीची किंमत ६४,९०० रुपये आहे.

आयफोन १७ इ ची सुरुवातीची किंमत मागील मॉडेलच्या तुलनेत जास्त आहे, ज्याचे कारण कदाचित मेमरी चिप्सची कमतरता आहे. गेल्या वर्षी आयफोन १६इ ५९,९०० रुपयांना लॉन्च करण्यात आला होता.

तथापि, १६इ च्या बेस मॉडेलमध्ये १२८जीबी स्टोरेज होते, तर १७इ च्या बेस मॉडेलमध्ये २५६जीबीमेमरी देण्यात आली आहे. दोन्ही डिव्हाइस ४ मार्च रोजी संध्याकाळी ७:४५ वाजल्यापासून बुक करता येतील, तर विक्री ११ मार्चपासून सुरू होईल.

# साहित्यिक रणजित देसाई




## निमित्त

प्रसिद्ध साहित्यिक रणजित देसाई यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म ८ एप्रिल १९२८ रोजी झाला. प्रसिद्ध कादंबरीकार, कथालेखक, नाटककार अशी त्यांची ख्याती होती. रणजित देसाई मूळचे कोल्हापूरच्या कोवाडचे. इंग्रजी शाळेत असतानाच त्यांनी लेखनाला सुरुवात केली. कोल्हापूरच्या 'महाद्वार' मधून त्यांनी कथालेखन करायला सुरुवात केली. इंटर नापास असलेल्या देसाई यांनी १९४७ मध्ये प्रसाद मासिकाने आयोजित केलेल्या कथास्पर्धेत भैरव ही कथा लिहिली. त्यांच्या कथेला पारितोषिक मिळाले. या पारितोषिकामुळे त्यांच्या कथालेखनाला प्रोत्साहन मिळाले. रुपमहाल , कणव , जाण, कातळ, गंधाली, कमोदिनी, आलेख, मधुमती, मोरपंखी सावल्या असे अनेक लोकप्रिय कथासंग्रह त्यांनी लिहिले. सामाजिक आशयाच्या ग्रामीण परिवेशातील त्यांच्या कथांमधून त्यांच्या लेखनाची खास वैशिष्ठ्ये जाणवतात. खेडुतांच्या जीवनाचे चांगुलपणा मांडणार्या आकर्षक शैलीतील कथा त्यांनी लिहिल्या. बारी, माझा गाव, या प्रारंभीच्या कादंबर्यांनंतर १९६२ मध्ये थोरल्या माधवराव पेशव्यांच्या जीवनावर त्यांनी स्वामी ही कादंबरी लिहिली. या कादंबरीने त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले. त्यानंतरच्या 'श्रीमान योगी' या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर लिहिलेल्या कादंबरीने त्यांची कादंबरीकार म्हणून असलेली लोकप्रियता अधिकच वाढली. रणजीत देसाई यांना 'स्वामी' ही माधवराव पेशव्यांच्या जीवनावर ऐतिहासिक कादंबरी लिहिली. त्यातून माधवराव पेशव्यांचे आयुष्य कमी असले तरी त्यांनी त्या कालावधीतही अनेक कर्तृत्ववान माणसे निर्माण केली असे दिसून येते.

तसेच त्यावेळी पानिपतच्या तिसर्या लढाईतील पराभवामुळे मराठा साम्राज्याचा मोहर गळून गेला होता. अशा वेळी अत्यंत धैर्याने आणि हिमतीने त्यांना मराठी लोकांना मानसिक आधार देऊन मराठा साम्राज्य नव्या ताकदीने उभे केले पानिपतातील पराभवाचा सूड घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर देसाईंनी लिहिलेल्या 'श्रीमान योगी' या कांदबरीमध्ये त्यांनी महाराजांचे जीवन आणि त्याचबरोबर हिंदवी स्वराज्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम याविषयी बारकाईने विश्लेषण केले आहे. शिवाजी महाराज एक व्यक्ती म्हणून त्यांची काय सुख दु:खे होती, यावर त्यांनी मंथन केले आहे. त्यात त्यांनी शिवाजी महाराजांनी पारंपरिक विचारसरणीमध्ये बदल केला. त्यामुळे त्यांना विजय संपादन करणे शक्य झाले, यावर प्रकाशझोत टाकला आहे.

ऐतिहासिक वातावरणाचे वैभव आणि व्यक्तीरेखांना दिलेली भावोत्कट उंची यामुळे त्यांच्या ऐतिहासिक कादंबर्यांनी लोकमानस जिंकले. स्वामीतील माधवराव आणि त्यांची पत्नी रमा तसेच श्रीमान योगीतील शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांच्या नात्याला देसाई यांनी वेगळी परिमाणे दिली.लक्ष्यवेध,पावनखिंड,कर्णाच्या जीवनावरील राधेय,राजा रविवर्मा अशा अनेक ऐतिहासिक, पौराणिक कादंबर्या लिहून देसाई यांनी या प्रकारच्या कादंबर्यांचे युग स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण केले. स्वामी, आदी नाटकेही त्यांनी लिहिली. अशा या थोर साहित्यिकाचे ६ मार्च १९९२ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुमची मुले हानिकारक अन्न खात आहेत का?

समोसा-कचोरीसारख्या स्ट्रीट फूडचे ४१.३% नमुने निकामी, मेंदूला हानी पोहोचवणाऱ्या रंगांचा वापर करण्यात येत असल्याचे आढळुन आले आहे डिसेंबर २०२५ मध्ये अन्न आणि सुरक्षा विभागाने राजस्थानमध्ये 'ईट राईट' मोहीम राबवली. यात केक, पेस्ट्री, चिप्स, चॉकलेट, नूडल्स आणि स्ट्रीट फूडसह ६७० नमुन्यांची तपासणी करण्यात आली. यापैकी ११.१९% खाद्यपदार्थ निर्धारित मानकांवर खरे उतरले नाहीत. अहवालात असे आढळून आले की, केक-आईस्क्रीमसारख्या अनेक उत्पादनांमध्ये सिंथेटिक रंगांचा वापर निर्धारित मर्यादेपेक्षा खूप जास्त होता, ज्यामुळे मुलांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य बिघडू शकते.



राज्याच्या अन्न सुरक्षा आणि औषध नियंत्रक आयुक्तालयामार्फत १ ते ३१ डिसेंबर या कालावधीत मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेचा उद्देश मुलांना दिले जाणारे अन्न सुरक्षित आहे की नाही? ते निर्धारित मानकांनुसार आणि योग्य माहितीसह विकले जात आहे की नाही? हे तपासणे होता.

वेगवेगळ्या पथकांनी राज्यभरातून ६७० नमुने घेतले. यात बिस्किट, केक, कोल्ड ड्रिंक्स, समोसे-कचोरीसारखे स्ट्रीट फूड, आईस्क्रीम, कॉटन कँडी आणि मिठाई यांचा समावेश होता. या नमुन्यांची अजमेर, अलवर, बांसवाडा, भरतपूर, बिकानेर, जयपूर, जोधपूर, कोटा आणि उदयपूर येथील प्रयोगशाळांमध्ये तपासणी करण्यात आली. ६७० पैकी ७५ नमुन्यांमध्ये (११.१९%) त्रुटी आढळल्या.

**सर्वात जास्त धोका कोणत्या खाद्यपदार्थांमध्ये?**

तयार अन्न : स्ट्रीट फूड आणि रेडी-टू-ईट फूडमध्ये सर्वाधिक ४१.३ टक्के दोष आढळले.

पेय पदार्थ : कोल्ड ड्रिंक्स आणि ज्यूस श्रेणीतील ३०.७% नमुने निकामी आढळले.

बेकरी उत्पादने : केक, पेस्ट्री आणि बिस्किटच्या २४% नमुन्यांमध्ये त्रुटी आढळल्या.

**मेंदूला हानी पोहोचवणाऱ्या रंगांचा वापर**

सिंथेटिक रंग : तपासणीत असे समोर आले की, खाण्यामध्ये सिंथेटिक रंगांचा खूप जास्त वापर केला गेला होता. हे गडद पिवळे आणि नारंगी रंग मुलांच्या मेंदू आणि वर्तनावर वाईट परिणाम करू शकतात.

# रायगड जिल्ह्यात फिरती लोक अदालत आणि कायदेविषयक शिबिरांना प्रारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**



मुंबई उच्च न्यायालय विधी सेवा समिती यांच्या निर्देशानुसार आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगडचे अध्यांक्ष राजेंद्र सावंत च्या मार्गदर्शनाखाली न्याय आपल्या दारी या उपक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यात फिरते लोक अदालत व कायदेविषयक शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

२ ते ३० मार्च या कालावधीत संपूर्ण रायगड जिल्ह्यात फिरते लोक अदालत कार्यरत राहणार असून विविध तालुक्यांमध्ये जाऊन प्रलंबित प्रकरणांचा तडजोडीने निपटारा तसेच नागरिकांना कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. न्याय आपल्या दारी या संकल्पनेतून सर्वसामान्य नागरिकांना जलद सुलभ व विनामूल्य न्याय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देश या उपक्रमामध्ये आहे.

रायगड जिल्हा न्यायालय, अलिबाग येथे या उपक्रमाचे उद्धाटन २ मार्च रोजी जिल्हा न्यायाधीश-२.एस. आर. तिवारी, यांच्या हस्ते करण्यात आले. या फिरत्या लोक अदालतीसाठी श्रीकांत उपाध्ये (निवृत्त न्यायाधीश) यांची कक्ष न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.या कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा न्यायाधीश ३ एस.डी. भगत, तसेच न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगच्या सचिव श्रीमती तेजस्विनी निराळे, अलिबाग या कार्यक्रमास उपस्थित होत्या.अलिबाग वकील संघटनेचे अध्यक्ष एड. प्रसाद पाटील , उपाध्यक्ष एड. ए .डी.पाटील ,सचिव एड. अमित देशमुख उपस्थित होते.

ही फिरती लोक अदालत ३० मार्चपर्यंत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये जाऊन लोक अदालत आयोजित करणार असून नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगडचे अध्यक्ष राजेंद्र द.सावंत यांनी केले आहे.

# रोहा येथे लोकनेते दत्ता पाटील यांची जन्मशताब्दी उत्साहात साजरी

**नागोठणे : प्रतिनिधी**

एज्युकेशन सोसायटी संचलित कोएसो मेहेंदळे विद्या संकुलात स्वर्गीय लोकनेते ड. दत्ता पाटील (दादा) यांची १०० वी जयंती शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली.

कोकण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष, निष्णात वकील, उत्कृष्ट वक्ते, शेकापचे ज्येष्ठ नेते तसेच विधान परिषदेतील नामवंत विरोधी पक्षनेते म्हणून दादा यांची ओळख होती. वंचित बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी खेडोपाडी शाळारूपी ज्ञानगंगा पोहोचवून मोठे कार्य केले.



या कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे चेअरमन संदीप गांगल व प्राचार्य रमेश मोसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी मेहेंदळे हायस्कूलचे ज्येष्ठ शिक्षक के. आर. पाटील व नारायण पानसरे यांच्या हस्ते वंदनीय दादांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सोबत विलास जाधव, संग्राम गायकवाड, भिवा कोकरे, संदीप चांदोरकर, मारुती लोहकरे, अस्मिता तेंडुलकर, मनीषा निमण, मनीषा पाटील, समिता वाघमारे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी स्नेहल वाघ, महेंद्र पाटील, संदीप पवार, संतोष वाघमारे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान ज्येष्ठ शिक्षक नारायण पानसरे यांनी दादा यांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# उर्दू शाळेत मराठी भाषेचा जयजयकार; राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**




भाषा, धर्म, जात आणि पंथ वेगवेगळे असले तरी भारताची ओळख एकात्मतेत आहे याचा जिवंत अनुभव माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथील ए.के.आय.उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे पाहायला मिळाला. येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

उर्दू शाळेच्या प्रांगणात मराठी भाषेचा घुमणारा आवाज ऐकून उपस्थितांच्या मनात अभिमान आणि आपुलकीची भावना निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून 'भाषा वेगळी असली तरी संस्कृती आणि देश एकच' असा हृदयस्पर्शी संदेश दिला.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त हा मराठी गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात इयत्ता पाचवी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. या निमित्ताने शाळेत मराठी साहित्य,कविता,नाटिका आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांद्वारे मराठी भाषेचे सौंदर्य आणि महत्त्व विद्यार्थ्यांनी अनुभवले. कार्यक्रमातील सर्वाधिक आकर्षण ठरले ते 'महाराष्ट्र गीत'चे सामूहिक सादरीकरण आणि 'नारींचे महत्त्व' अधोरेखित करणारी विविध पारंपरिक वेशभूषा. या सादरीकरणातून विद्यार्थिनींनी स्त्रीशक्तीचा सन्मान आणि संस्कृतीची जपणूक याचा प्रभावी संदेश दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी फाउंडेशनच्या प्रतिभा मोरे आणि शाळेचे ज्येष्ठ शिक्षक मणेरी सलीम यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण ९३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे परीक्षण कैसर हर्गे आणि समीर गजगे यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक मुनीर अहमद यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व विविध उदाहरणांतून स्पष्ट केले. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृती,परंपरा आणि माणुसकी जपणारी शक्ती आहे,असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना सर्व भाषांचा आदर करण्याचे आवाहन केले.

स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना मराठी विभागाच्या वतीने बक्षिसांचे वितरण करण्यात आले. उर्दू माध्यमाच्या शाळेत मराठी भाषा गौरव दिनाचा असा उत्साहात साजरा झालेला सोहळा म्हणजे खऱ्या अर्थाने भाषिक सलोखा,सांस्कृतिक एकात्मता आणि भारतीयत्वाचा सुंदर संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला. विद्यार्थ्यांनी दिलेला हा एकात्मतेचा संदेश समाजासाठीही दिशादर्शक ठरत आहे.

# मुरुड येथे लाईनमन दिवस साजरा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड उपविभाग महावितरण कार्यालयामध्ये लाईनमन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.मुरुड उपविभागा अंतर्गत कार्यरत सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गुणगौरव म्हणून केंद्र शासनाच्या आदेशानुसार ४ मार्च हा दिवस लाईनमन दिवस म्हणून साजरा करण्यात येतो .



उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास उपविभाग महावितरण कार्यालयामार्फत मुरुड उपविभागातील सर्व शाखा - मुरुड शहर शाखा, मुरुड ग्रामिण शाखा, बोल मांडला शाखा, कोकबन शाखा, आगरदांडा शाखा माझगाव व नांदगाव या शाखा कार्यालायामधील सर्व कर्मचाऱ्याना आमंत्रित करण्यात येऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला

यावेळी सहाय्यक अभियंता दिनेश ढाले, परमानंद बैकर, कनिष्ठ अभियंता मनोज देशमुख, संदेश होंडे, सतीश खरात, सचिन पवार, कासिम शैख मुख्य तंत्रज्ञ राजेंद्र पवार , सूत्रसंचालक समीर शिंदे, नियोजक . प्रणित वाडकर, गौरी राठोड बिलिंग विभाग - . विनायक ताजवे सहाय्यक लेखापाल, श्रीमती. सुप्रिया साष्टे-उच्चस्तर लिपिक, व सर्व जनमित्र मोठ्या संखेने उपस्थित होते.

उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांनी सांगितले की, मुरुड शहर व ग्रामीण भागातील वीज पुरवठा सुरळीत व व्यवस्थित ठेवण्याचे महत्वपूर्ण काम लाईनमन करीत असतात. त्यांच्यामुळेच वीज पुरविण्यात महत्वाची मदत होत असते. २४ तास काम करणाऱ्या कर्मचारी वृंदांचा सत्कार करणे हे मी माझे भाग्य समजतो. वीज पुरवठ्यामध्ये लाईनमन यांची महत्वाची भूमिका असून त्यांचे कर्तव्य ते अतिशय उत्कृष्ट बजावत आहेत. यावेळी वीज महावितरण मध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या लाईनमन यांचा सत्कार करण्यात आला.

# महाआराध्य प्रतिष्ठानतर्फे राजिप उमरोली शाळेची रंगरंगोटी

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या महाआराध्य प्रतिष्ठानतर्फे माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा उमरोली - खरवली या शाळेची रंगरंगोटी करण्यात आली. त्यानिमित्ताने उमरोली शाळेत शनिवार दि.२८ फेब्रुवारी रोजी कृतज्ञता सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना महाआराध्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद धारिया यांनी आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भावी नागरिक असल्याचे सांगितले.



महाआराध्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद धारिया,संचालिका अंकिता धारिया हे आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो या उदात्त हेतूने आपल्या प्रतिष्ठानमार्फत विविध सामाजिक,शैक्षणीक उपक्रम सातत्याने राबवित असतात. त्यामुळे या प्रतिष्ठानचे नाव आज रायगड जिल्ह्यात सर्वदूर पोहचले आहे. राजिप उमरोली शाळेची रंगरंगोटी करण्याबाबत महाआराध्य प्रतिष्ठानला शिक्षकांकडून निवेदन देण्यात आले होते. या निवेदनाची दखल प्रतिष्ठानने घेऊन उमरोली शाळेची चांगल्याप्रकारे रंगरंगोटी केली. याचे उत्तरदायित्व म्हणून शाळेतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन या कार्यक्रमात महाआराध्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद धारिया यांचा खास सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रतिष्ठित व्यापारी विक्रांत गांधी,चारिझेन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा,किशोर झेमसे,शाळा व्यवस्थापन कमिटी,मुख्याध्यापक नीता काळोखे,शिक्षक प्रदीप आडीत,पालकवर्ग,विद्यार्थी,ग्रामस्थ आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक प्रदीप आडीत यांनी केले

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर; प्रशासन सज्ज

**कर्जत : प्रतिनिधी**

'महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाच्या संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे. तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान आयोजित करण्यात आले आहे. या अभियानासाठी कर्जत तालुका व खालापूर महसूल विभाग सज्ज आहे.' अशी माहिती उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.




कर्जतच्या प्रशासकीय भवनामध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, भूमीअभिलेख अधिक्षक नितीन अटाळे उपस्थित होते. यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी, ' जरी हे अभियान महसूल विभागाचे असले तरी त्यामध्ये कृषी विभाग, आरोग्य विभाग, भूमी अभिलेख आदींचाही समावेश असणार आहे. या अभियानात आदिवासी बांधवांच्या समस्या सोडविण्यावर भर दिला जाईल. ज्या भागात हे अभियान राबविण्यात येणार आहे. त्या भागात दवंडी पिटविण्यात येणार असून रिक्षा फिरवून धवनिक्षेपाद्वारे लोकांना माहिती देण्यात येईल. विविध योजनांची माहिती देण्यात येऊन जे योजनांपासून वंचित आहेत. त्यांना त्यामध्ये सामावून घेण्यात येईल. असे सांगितले.

' कर्जत तालुक्यात ७ मार्च रोजी डिकसळ - चिंचवली येथील रोहित मंगल कार्यालयात या अभियानाची सुरुवात होणार आहे. तर खालापूर तालुक्यात रायगड जिल्हा परिषद शाळा जांबरूग येथून सुरुवात होणार आहे. असे संकपाळ यांनी सांगितले.

# ताडगोळ्यांना पर्यटकांची खास पसंती; उन्हाळ्यामुळे मागणी वाढली

**रेवदंडा : प्रतिनिधी**

वाढत्या उन्हाळ्यामुळे जिल्ह्यात ठिकठिकाणी ताडगोळ्यांना मागणी वाढत आहेत. अलिबाग तालुक्यातील चौल आणि सासवणे परिसरात मोठ्या प्रमाणात झाले आहेत. सध्या चौलमधील 'ताडगोळे' पर्यटकांची खास पसंती असून मोठी मागणी ऐन उन्हाळयात असते. चौल परिसरात ताडाची असंख्य झाडे असून ताडगोळे विक्रीतून मोठे उत्पत्र स्थानिक साधतात.

ऐन उन्हाळ्याचे दिवसात ताडगोळे थंडावा म्हणून पसंतीचे असतात.त्यामुळेच मुंबई, पुणे, ठाणे आदी शहरातून तसेच परिसरातून आलेले पर्यटक तसेच स्थानिकवर्ग ताडगोळे खरेदी करत असल्याचे चित्र रेवदंडा-चौल बाजारपेठेत दिसते. चौलमध्ये नारळ पोफळीच्या बागेसह ताडाची झाडे सुध्दा विपुल असून त्याला येणाऱ्या नारळासारख्या फळांना ताडगोळे म्हणतात. या फळांतला गर पाणीदार व चवदार असून उंच उंच ताडाच्या झाडावर चढून काढण्याचा व फळांतील गर काढण्यास कस लागतो.



**चौलमध्ये विपूल उत्पादन; स्थानिकांना रोजगार**

उन्हाळयात येत असलेल्या ताडगोळयांना बाजारात चांगली मागणी असते. उन्हाळयाचे दिवसात अंगाची लाही लाही होत असताना नैसर्गिक थंडावा देणारे ताडगोळे शरिरातील पाण्याचे प्रमाण टिकवून धरतात. कृत्रिम थंडाव्यापेक्षा ताडगोळयांसारखा नैसर्गिक उपाय केव्हाही आरोग्यासाठी चांगलाच परिणामकारक ठरतो. ज्यांना वजन घटवायचे असेल त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे तसेच फळातील रसामुळे भूक शमविण्यास मदत



होते. त्यामुळे वारंवार खाण्याची इच्छा होत नाही. ज्यांना लिव्हरच्या संबंधित काही विकार असतील त्यांचेसाठी ताडगोळयांचे सेवन उपयुक्त आहे.

ताडगोळयांचे आयुर्वेदातही अनेक औषधी उपयोग सांगितले आहेत. ताडगोळे हे फळ ठराविक ऋतूमध्ये म्हणजे उन्हाळयात उपलब्ध असणारे फळ आहे. यांची चव काहीशी शाहळयांतील मलईसारखी लागत असून चवीला हे फळ फारच मधूर असते. इंग्रजी भाषेत 'आईस ॲपल' म्हणून ओळखले जाणारे फळ आरोग्याच्या दृष्टीने अतिशय गुणकारी असल्याचे म्हटले जाते.या फळाच्या सेवनाने शरिराला आवश्यक असलेले क्षार व इतर पोषक तत्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात. ज्यांना त्वचेवर उन्हाळयात सतत पुरळ येत असेल, तसेच ज्यांना या दिवसात चेहऱ्यावर मुरूमे येत असतील त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोगारी प्रतिरोधी तत्वे असून विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले जाते.

आरोग्यासाठी या फळाचे फायदे मिळविण्यासाठी उन्हाळयाच्या दिवसामध्ये या फळाचे भरपूर सेवन करावे, घश्याला पडणार्या कोरडवर उपाय म्हणून बाजारातील शितपेय किंवा बर्फाचे गोळयांवर ताव मारतात, परंतु कृत्रिक थंडाव्यापेक्षा ताडगोळयांसारखा नैसर्गिक उपाय केव्हाही आरोग्यासाठी चांगलाच परिणामकारक ठरतो. ज्याना वजन घटवायचे असेल त्याच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे तसेच फळातील रसामुळे भुक शमविण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार खाण्याची इच्छा होत नाही. ज्याना लिव्हरच्या संबंधीत काही विकार असतील त्याचेसाठी ताडगोळयांचे सेवन उपयुक्त आहे. या फळामध्ये पोटॅशियम मुबक मात्रेमध्ये असून लिव्हरमध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. या फळाच्या सेवनाने शरिराला श्रम करण्याची आवश्यक ताकद व उर्जा मिळते. या फळाच्या सेवनाने शरिरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्याने दिवसभरासाठी लागण-ताकद या फळाच्या सेवनातून मिळत असते.

अश्या या गुणकारी ताडगोळे फळांची फार मोठी मागणी उन्हाळयात पर्यटक व स्थानिक वर्ग करत असतो. चौल परिसरात आर्थिक उत्पन्न देणारे ताडवृक्ष असंख्य संख्येने असून या ताडाच्या वृक्षाच्या लागवड करणे दिवसेंदिवस गरजेचे आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही **१. कै. अनुसया बाळाराम पवार तर्फे कायदेशीर वारस श्रीमती शैला गणेश पाटील व इतर, २. कै. शेवंतीबाई महादू पाटील तर्फे कायदेशीर वारस सौ. सुंदर कानू फडके व इतर ३. श्रीमती पार्वती चाहू पाटील, ४. श्रीमती भागीरथी कृष्णा पाटील, ५. श्रीमती बेबी दत्ता पाटील, ६. श्रीमती रंजना नारायण म्हात्रे** यांच्या वडिलोपार्जित मालकीची असून, सदरील मिळकती संदर्भात मे. दिवाणी न्यायाधिश, क.स्तर पनवेल यांचे न्यायालयांत रे.मु.नं. ९७/२०२६ हा दावा प्रलंबित असुन सदरहू मिळकती संदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री, हस्तांतरण अगर अन्य कोणत्याही प्रकारचा करार मदार करू नये. जर कोणीही सदर खालील नमुद मिळकती संदर्भात कोणताही व्यवहार, करार, मदार केल्यास त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट)**

**मौजे-बोनशेत, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ३ | ११ | १-२९-२० <br> पो.ख. ०-०९-१० <br> एकूण-१-३८-३० | १८.१४ |

वर नमुद मिळकतीवर आमचे अशिलांचा वडिलोपार्जित हक्क व हिस्सा असुन सदर मिळकती संदर्भात आमच्या अशिलांच्या परवानगी शिवाय कोणताही व्यवहार करण्यांत येवू नये.

येणेप्रमाणे नोटीस दिली.

**पनवेल,**

**दिनांक :-०५/०३/२०२६.**

**sd/-**

**ADV. SANGAM P. SAWANT**

**M.COM., DBM, LLM**

Office :- Shop No. 6, Pawan Apartment, A-One Zerox Shop, Opp. Panvel Dist. Court, Lokhandi Pada, Old Panvel, Dist. Raigad. 410206

Mob. No. 9821834292, 8767398248

# बेलापूर टेकड्यांवर भीषण वणवा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील बेलापूर टेकड्यांवर बुधवारी भीषण वनाग्नी भडकला. आकाशाला भिडणाऱ्या ज्वाळांमुळे परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

ही आग कल्पतरू आणि विकासिनी सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांच्या मागील बाजूने स्पष्टपणे दिसत होती. आम्ही अत्यंत चिंतेत आहोत. या निसर्गरम्य टेकड्यांवर आग लागण्याची ही पहिली वेळ नाही, असे पर्यावरण कार्यकर्ते कपिल कुलकर्णी यांनी सांगितले.



पर्यावरणवादी संघटनांनी आरोप केला की, अशा वारंवार लागणाऱ्या आगींचा संबंध बेकायदेशीर जमिनीच्या वापरासाठी

## निसर्गसंपदा आणि वन्यजीवांना धोका

हरितावरण नष्ट करण्याच्या प्रयत्नांशी असू शकतो. नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे.

गेल्या दशकभरापासून बेलापूर टेकड्या कथित जमीन बळकावणे, हरितावरणाचा नाश आणि सुमारे २.३ लाख चौरस फूट क्षेत्रात उभारण्यात आलेल्या बेकायदेशीर धार्मिक बांधकामांमुळे वादाच्या केंद्रस्थानी आहेत.

अतिक्रमण रोखणे आणि अशा संशयास्पदपणे वारंवार लागणाऱ्या आगींची चौकशी करणे ही आता सिडकोची जबाबदारी असल्याचा कार्यकर्त्यांचा आग्रह आहे.

पर्यावरणवाद्यांच्या मते, या आगीमुळे केवळ हरितावरणाचा नाश होत नाही, तर टेकड्यांवरील वन्यजीवही विस्थापित होतात. त्यामुळे पक्षी व प्राणी त्यांच्या नैसर्गिक अधिवासातून बाहेर पडण्यास भाग पडतात आणि नाजूक पर्यावरणीय संतुलन बिघडते.

# उरणच्या हवा गुणवत्तेत सुधारणा

**उरण : बातमीदार**

हवेच्या गुणवत्तेचा परिणाम मानवी जीवनावर होत असून त्यावर त्वरित उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. काही महिन्यांपूर्वी असलेला हवेचा गुणवत्ता निर्देशांक जास्त होता आता तो कमी झाल्याने दिलासा मिळाला आहे.

उरण परिसरातील हवा गुणवत्ता निर्देशांक ९० अंकावर आला आहे. त्यामुळे वातावरण आल्हाददायक बनले होते. काही दिवसांपूर्वी अचानक आलेल्या पावसाच्या सरींमुळे उरणच्या हवा गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा झाली होती. आता पुन्हा वातावरणात बदल झाल्याने शहरातील हवा स्वच्छ झाली आहे.

काही दिवसापूर्वी हवेचा गुणवत्ता निर्देशांक ७० ते १०० एक्यूआय अंकाच्या दरम्यान नोंदविला गेला होता. उरण परिसरात रस्ते, विविध उद्योग, बांधकामे यामुळे हवेतील वाढते धूलिकण आणि तापमानामुळे उरणच्या हवा गुणवत्ता निर्देशांकात सतत वाढ होत होती. ही मात्रा ८० ते १५० पेक्षा अधिक नोंदविली जात होती, मात्र काही दिवसांपासून हवा गुणवत्ता निर्देशांकात सातत्याने सुधारणा होत आहे. हवा शुद्ध झाल्याने वातावरण निसर्गरम्य बनले आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून उरण तालुक्यात २०० पेक्षा वर हवेचा निर्देशांक नोंदविण्यात येत होता. ही हवेची प्रदुषित मात्रा मानवी शरीरासाठी अतिशय हानीकारक आहे. बदलत्या वातावरणामुळे तापमान आणि आद्रतेत ही वाढ झाली आहे. हवेतील वाढते धुळीचे प्रमाण याचा परिणाम येथील नागरिकांच्या शरीरावर होत आहे. यामुळे निसर्ग प्रेमी व पर्यावरणवाद्यांनी त्यावेळी चिंता व्यक्त केली होती.

# वाहतूक पोलीस वाहन सुरक्षा अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाहतूक पोलीस वाहन सुरक्षा अभियान २०२६ हे भावना ग्रुपच्या साथीने नवी मुंबईत झाले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वाहतूक सुरक्षा व वाहतुकीचे नियम हे ठीक ठिकाणी जाऊन सांगण्याचा समजावण्याचा मार्गदर्शन करण्याचा हेतू घेऊन नवी मुंबई पोलिसांनी भावना ग्रुप नवी मुंबई याची साथ घेतली. भावना ग्रुप नवी मुंबई आणि खा खेळा वाचा अभियान मालक राजेश शहा आणि मालक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाने त्यांच्या कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांना निपुण अशी माहिती देऊन वाहतुकीचा संदेश नियम आणि सुरक्षा पोलिसांसोबत कर्मचाऱ्यांनीही हा संदेश दिला.

नवी मुंबईतील अनेक शाळांमध्ये अनेक कंपन्यांमध्ये जाऊन भावना ग्रुपच्या कर्मचाऱ्यांनी आणि पोलिसांनी समाजाला पुनश्च एकदा वाहतूक सुरक्षेची आणि वाहतूक नियमांची जाणीव आणि ओळख करून दिली.



# अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्ती सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतून माहे डिसेंबर २०२५, जानेवारी व फेब्रुवारी २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या २८ अधिकारी, कर्मचारी यांचा सेवानिवृत्ती सन्मान समारंभ महापालिका मुख्यालयात ज्ञानकेंद्र येथे उत्साहात झाला.



यावेळी उपमहापौर दशरथ भगर्ते अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ कैलास गायकवाड, मुख्य विधी अधिकारी अभय जाधव, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ रत्नप्रभा चव्हाण, माजी उपायुक्त डॉ.अमरीश पटनिगिरे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

या सेवानिवृत्ती सन्मान समारंभामध्ये डिसेंबर २०२५ महिन्यात सेवानिवृत्त झालेल्या महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, सहाय्यक लेखा अधिकारी वसंत म्हात्रे, मुख्याध्यापिका नलिनी चौधरी, इंदिरा पाटील, वंदना राऊत, प्राथमिक शिक्षक चंदू भदाणे, नेहा पालव, पद्मिनी तांबे, अधिक्षक प्रकाश वाकचौरे, सहाय्यक अभियंता विकास वखारे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुजाता चौधरी, सिस्टर इन्चार्ज पुष्पा गुप्ता, स्टाफ नर्स मिथिला शिंदे, सहाय्यक अधिसेविका कल्पना कोळेकर, ऑक्झलरी नर्स मिडवाईफ जयंती पुजारी, वाहनचालक भागवत कोरडे, सफाई कामगार शकुंतला म्हस्के, सफाई कामगार भानुदास रसनभैरे यांना सन्मानित करण्यात आले.

त्याचप्रमाणे जानेवारी २०२६ महिन्यात सेवानिवृत्त झालेले स्वच्छता अधिकारी विजय पडघन, प्राथमिक शिक्षिका मीनाक्षी हिंगे, अधिक्षक श्वेता लोखंडे तसेच फेब्रुवारी २०२६ महिन्यात सेवानिवृत्त झालेले उपमुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे, मुख्याध्यापक महेश पाटील, मेट्रन रेचल पटनीगिरे, आरोग्य सहाय्यक बाळकृष्ण वर्ये, समुदाय समन्वयक मोहन गायकवाड, वाहनचालक दत्तात्रय पाटील यांचाही शाल पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्यासमवेत महापालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेणारे उपमुख्य लेखा वित्त अधिकारी तथा उपमुख्य लेखा परीक्षक श्याम पाटील यांनाही सन्मानित करण्यात आले.

# पनवेलमध्ये स्त्री सन्मान सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनानिमित्ताने कोकण मराठी साहित्य परिषद रायगडच्यावतीने पनवेलमध्ये स्त्री सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कोकण मराठी साहित्य परिषदेच्या रायगड जिल्ह्यातील साहित्यिक महिलांना पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केले जाणार आहे.

शनिवार दि.७ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता पनवेलच्या श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, सभागृह (मार्केटयार्ड) येथे होणाऱ्या समारंभास पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील, चित्रपट नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, कोकण मराठी साहित्य परिषदेचे विश्वस्त रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील, कोमसापचे रायगडचे अध्यक्ष संजय गुंजाळ, जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी उपस्थित राहणार आहेत, या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन रायगड जिल्हा कोकण मराठी साहित्य परिषदेच्या महिला प्रमुख संध्या दिवकर यांनी केले आहे.

# जेएनपीटी कामगारांच्या लढ्याला यश
## ग्रॅच्युइटी मिळण्याचा मार्ग मोकळा

**उरण : बातमीदार**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीटी) येथील तीन निवृत्त कामगारांना दीर्घ कायदेशीर लढ्यानंतर ग्रॅच्युइटीची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

विधिज्ञ विनायक कोळी यांच्या प्रभावी युक्तीवादामुळे केंद्रीय कामगार आयुक्तांनी कामगारांच्या बाजूने निर्णय दिला आहे. १९८९मध्ये स्थापन झालेल्या जेएनपीटीमध्ये कंत्राटी स्वरूपात कार्यरत असलेले रमेश विठ्ठल घरत, ज्ञानेश्वर घरत आणि नारायण पाडवे हे इलेक्ट्रिक विभागातील कर्मचारी २०१५-१६ मध्ये निवृत्त झाले, मात्र संबंधित ठेकेदारामार्फत त्यांना ग्रॅच्युइटीची रक्कम देण्यात आली नव्हती. ऑक्टोबर २०२४ मध्ये सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाने नियुक्तीपासून सेवानिवृत्तीपर्यंतची ग्रॅच्युइटी तसेच निवृत्ती दिनांकापासून प्रत्यक्ष रक्कम मिळेपर्यंत १० टक्के वार्षिक व्याज देण्याचे आदेश दिले होते. या आदेशाविरोधात जेएनपीएने २०२५ मध्ये अपील दाखल केले.

या प्रकरणात विधिज्ञ विनायक कोळी यांनी कामगारांचे प्रतिनिधीत्व करत केंद्रीय कामगार आयुक्तांसमोर ठोस मांडणी केली. अखेरीस जेएनपीटीने नमते घेत तिन्ही कामगारांना मंजूर पूर्ण ग्रॅच्युइटी रक्कम तसेच निवृत्तीच्या तारखेपासून ३० जानेवारी २०२६ पर्यंत ६ टक्के व्याज देण्यास मान्यता दिली.

# पक्षी विज्ञान, चिमणी संवर्धन कृतीवर जनजागृती



**उरण : बातमीदार**

राष्ट्रीय विज्ञान दिवसानिमित्ताने मॉडर्न स्कूल आणि ज्यु.कॉलेज, वाशी येथे पक्षी विज्ञान आणि चिमणी संवर्धन कृती या विषयावर फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था चिरनेर उरण रायगड महाराष्ट्र तर्फे संस्थेचे सदस्य निकेतन रमेश ठाकूर यांनी उपस्थित ३५० विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासमोर व्याख्यान व चिमणी संवर्धन कृती म्हणून टाकाऊ वस्तूंच्या पासून चिमण्यांची घरटी बनविण्याचा उपक्रम घेण्यात आला.


टाकाऊ रोल्स, पुठ्ठे यांचा वापर करून एकूण ७५ घरटी ह्या उपक्रमातून विद्यार्थ्यांकडून बनविण्यात आली व ती त्याच विद्यार्थ्यांना भेट म्हणून देण्यात आली. या कार्यक्रमासाठी शाळेच्या प्राचार्या सुमित्रा भोसले, शिक्षक तुषार म्हात्रे, विलास कुडावकर, शिक्षिका रिया ठाकूर व शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे मोलाचे सहकार्य लाभले.


# विहान आणि आर्यनला इन्स्पायर अवॉर्ड

**नवी मुंबई : बातमीदार**

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे संपूर्ण देशभरात इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांकरिता इन्स्पायर अवॉर्ड ही योजना ठेवली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांना रुपये १० हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येते.

नेरूळ येथील विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेत शिकणारा विहान राधिका अक्षय भोसले (इ.६वी), विद्याभवन माध्यमिक मराठी व ज्युनिअर कॉलेज चा आर्यन सचिन बोराडे (इ.१०) या विद्यार्थ्याने सलग तीन वर्ष पुरस्कार मिळवत यावर्षी सुद्धा सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचे इन्स्पायर अवॉर्ड पुरस्कार प्राप्त केला आहे. विद्याभवनचे हे वर्ष रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने या वर्षात





मिळालेले हे पुरस्कार नक्कीच सर्वांसाठी अभिमानाचे ठरले आहे.

याबद्दल पुणे विद्यार्थीगृह संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे, अमोल जोशी, कार्यवाह संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव दिनेश मिसाळ, इतर सर्व संचालक पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर, पालक व विद्यार्थी यांनी विहानच्या यशाबद्दल अभिनंदन केले आहे.

# ॲड. चपळगावकर यांची नियुक्ती

**पनवेल :** कामोठेचे रहिवासी आणि प्रकल्प अभियंता सारंग चपळगावकर यांचे चिरंजीव ॲड. सिद्धार्थ चपळगावकर यांची सर्वोच्च न्यायालयाचे ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड म्हणून नियुक्ती झाली आहे.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड (AOR) हा एक विशेष पात्रता असलेला वकील असतो जो संविधानाच्या कलम १४५ आणि सर्वोच्च न्यायालय नियम, २०१३ च्या आदेश खत अंतर्गत अशिलांकरिता काम करण्यासाठी आणि बाजू मांडण्यासाठी अधिकृत असतो. केवळ AORM अर्ज दाखल करू शकतो, बाजू मांडू शकतो किंवा थेट उपस्थित राहू शकतो, ज्यामुळे प्रक्रियात्मक मानकांचे काटेकोर पालन होते. ते नियमित वकिलांपेक्षा वेगळे असतात.

# अकरावीच्या विद्यार्थ्यांची जीएसटी कार्यालयास भेट

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

इनरव्हिल क्लब संस्था, बेलापूर यांच्यावतीने इयत्ता अकरावी कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना राज्याच्या विकासात करप्रणालीचे योगदान' याबाबत माहिती होण्याकरीता २७ फेब्रुवारी रोजी जी.एस.टी. कार्यालय, नवी मुंबई येथे अभ्यास भेट आयोजित करण्यात आली होती.

या अभ्यास भेटीवेळी राज्य कर कार्यालय (जीएसटी) विभागाचे उपायुक्त विवेकानंद साळवे यांनी कर प्रणाली नेमकी कशी कार्यरत असते, सर्वसामान्य व्यक्तींकडून कर आकारणी कशाप्रकारे करण्यात येते, आकारलेल्या कराचा उपयोग राज्यातील विकासासाठी कसा केला जातो, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी शासकीय सेवेत करियर करण्याबाबत विचार करावा व



राज्याच्या विकासात हातभार लावण्याचे ध्येय प्रत्येक विद्यार्थ्याने समोर ठेवण्यासंबंधी यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी बेलापूर पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ११ वी कॉमर्स मधील ५५ विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी इनर व्हिल क्लब संस्था, बेलापूरच्या अध्यक्षा पूनम महाले यांनी अशा सामाजिक कार्यात राज्य कर कार्यालय विभागाने केलेल्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये निश्चित भर पडेल असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमात जीएसटी विभागाचे अधिकारी तसेच इनर क्लब संस्था बेलापूर यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# विसपुते कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून सेवाभावी उपक्रम

**कळंबोली : बातमीदार**

आदर्श शैक्षणिक समूह संचलित, श्री. बापूसाहेब डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्या बी.एड. विद्यार्थ्यांतर्फे २८ व १ मार्च २०२६ रोजी युसुफ मेहरली सेंटर येथे आयोजित समाजसमवेत शिबिराने खऱ्या अर्थाने शिक्षकत्वातील सामाजिक बांधिलकीचा दीप प्रज्वलित केला.



महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. सीमा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या दोन दिवसीय शिबिरामध्ये भावी शिक्षकांमध्ये समाजसेवा, सामाजिक मूल्यांची रुजवणूक, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता व श्रमदानाची जाणीव दृढ करण्याचा संकल्प करण्यात आला.

शिबिराची सुरुवात ज्ञानपेटी उपक्रमांतर्गत सुषमा पाटील विद्यालय, कामोठे येथील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाने झाली. उद्घाटन आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराजजी विसपुते सर यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रायगडचे डॉ. योगेंद्र म्हात्रे, गणेश दुर्गे (मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय भातान), राजेंद्र कारंजकर, युसुफ मेहेरअली सेंटरचे व्यवस्थापक बाळकृष्ण सावंत हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने शिबिरास प्रारंभ झाला.

डॉ. विनायक लोहार यांनी समाजसेवेची प्रतिज्ञा देत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. School Connect उपक्रमांतर्गत डॉ. योगेंद्र म्हात्रे यांनी शिक्षकाचे व्यावसायिक जीवन व शालेय प्रशासनातील आव्हाने यांवर सखोल मार्गदर्शन केले. मानसी पाटील यांनी आर्ट अँड क्राफ्ट कार्यशाळेतून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव दिला.

माजी विद्यार्थी संघटनेतर्फे प्रोमिता नाइू, श्वेता शेट्टीगार, जोशीला, तृप्ती सावंत व अभिजित भोपी यांनी प्रेरणादायी संवाद साधला. मराठी भाषा गौरव दिन व राष्ट्रीय विज्ञान दिन निमित्त विशेष कार्यक्रम, Cooking without Fire स्पर्धा आणि रंगतदार सांस्कृतिक सादरीकरणांनी पहिला दिवस उत्साहात साजरा झाला.

दुसऱ्या दिवशी आरोग्य जनजागृती अंतर्गत नृत्ययोग प्रात्यक्षिके, परिसर स्वच्छता अभियान, महिला सबलीकरण उपक्रमांतर्गत चारचाकी वाहन प्रशिक्षण तसेच पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकास कार्याची क्षेत्रभेट यांमुळे विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षणाची अमूल्य संधी लाभली.

समारोपावेळी इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुफ आकुला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शिबिराचा समृद्ध अनुभव व्यक्त केला.

हे शिबिर प्राचार्या डॉ. सीमा कांबळे, डॉ. विनायक लोहार व समाजसेवा प्रमुख डॉ. नेहा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले. डॉ. प्रितेश वाढे, प्रा. निलेश अडसुळे, प्रा. राजू गायकवाड, प्रा. सुषमा संकपाळ तसेच शिक्षकेतर कर्मचारी योगेश ठोकळ, शिवांजली पांढरपट्टे, दीपिका पाटील, महेश जाधव, संजय सुरवाडे यांच्या विशेष योगदानामुळे शिबिराची शोभा वाढली.

आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराज विसपुते व संचालिका संगीता विसपुते यांनी शिबिराच्या यशस्वीतेबद्दल शुभेच्छा दिल्या. समाजाशी नाळ जुळवत, सेवा आणि संवेदनशीलतेचा दीप उजळवत, भावी शिक्षकांनी घडवलेले हे शिबिर खऱ्या अर्थाने शिक्षणाला मानवतेची जोड देणारे ठरले.

# मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळ सार्वजनिक पाणपोईची गरज

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा हा औद्योगिकीकरणाने नटलेला परिसर असून वाढत्या औद्योगिकरणामुळे या भागातील लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. शिमग्यानंतर गरमी वाढत असल्याने उष्माघाताने हैराण झालेल्या नागरिकांना आपली तहान शमविण्यासाठी बाटलीतले विकतचे पाणी घेवून प्यावे लागत आहे.

परिसरातील काही गावांना पाणीटंचाईची समस्या सतावत आहे. याचा गैरफायदा उचलून पाणी विक्री चढत्या दरात होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यामध्येही ज्यांचे खिसे भरलेले आहेत त्यांना बंद बाटलीतील पाणी विकत घेण्याचा खर्च पेलावतो. त्यामुळे घराबाहेर पडल्यांवर सामान्य नागरिक तहान लागल्यावर उपलब्ध असेल ते पाणी पितो. यावेळी मिळणारे पाणी अस्वच्छ असेल तर नक्कीच आजारपणाला ते निमंत्रण असते. परिसरात जीवनावश्यक असणारी पिण्याच्या पाण्याबाबतच्या या समस्येचे निराकरणही होत नाही.

बाजारात खरेदी झाल्यानंतर पिण्याचे पाणी शोधण्याकडे त्यांचा कल असतो. अशावेळी तहान भागविण्यासाठी बाटलीतले पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तरी मोहोपाडा गावाच्या प्रवेशद्वाराजवळ सार्वजनिक पाणपोईची गरज असल्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# माथेरानमध्ये शुकशुकाट!

**नेरळ : प्रतिनिधी, बातमीदार**

पर्यटन नगरी माथेरानमध्ये ऐन होळी-धुलीवंदनाच्या सुट्ट्यांमध्येही यंदा अभूतपूर्व शुकशुकाट पाहायला मिळाला. एरव्ही या सणाच्या काळात गजबजून जाणारे बाजारपेठ, पॉईंट्स परिसर आणि मिनिट्रेन स्थानक यंदा मात्र ओस पडलेले दिसले. पर्यटकांची लक्षणीय घट झाल्याने येथील पर्यटनावर अवलंबून असलेल्या व्यावसायिकांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.

काही दिवसांपूर्वी ई-रिक्षा संघटनेने संख्यावाढीच्या मागणीसाठी बेमुदत बंद पुकारला होता. या आंदोलनाची बातमी सोशल मीडियावर आणि वृत्तपत्रांमधून मोठ्या प्रमाणात प्रसारित झाली. त्यामुळे माथेरानमध्ये स्वस्त व सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध नसल्याची भावना पर्यटकांमध्ये निर्माण झाली, अशी चर्चा सुरू आहे. सध्या ई-रिक्षा सेवा सुरळीत सुरू असली तरी याबाबत पुरेशी जनजागृती न झाल्याने अनेक पर्यटकांनी येथे येण्याचा बेत रद्द केल्याचे बोलले जात आहे.

नेरळहून धावणाऱ्या मिनिट्रेनमध्येही यंदा मोजकेच प्रवासी दिसून आले. बाजारपेठ, लहान-मोठे स्टॉलधारक, पॉईंट्स भागातील व्यावसायिक, लॉज व हॉटेल व्यावसायिक यांच्यावर याचा थेट परिणाम झाला आहे.

यंदा होळीच्या सलग सुट्ट्यांमध्येही माथेरान 'खाली-खाली' वाटत असल्याचे अनेकांचे मत आहे. यामागील नेमके कारण अधिकृतरीत्या स्पष्ट झाले नसले तरी एकीकडे दहावी बारावी विद्यार्थ्यांच्या सुरू असलेल्या परीक्षा तर मागील ई-रिक्षा बंद आंदोलनाचा अप्रत्यक्ष फटका बसल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ई-रिक्षा सेवा सुरू असल्याबाबत व्यापक माहिती प्रसारित झाल्यास आगामी काळात पर्यटकांची संख्या पुन्हा वाढेल, अशी अपेक्षा व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे.



## पर्यटन व्यवसायाला मोठा फटका

**सध्या हॉटेल व्यवसायात मोठी मंदी आहे. कामगारांचे पगार, वीज बिल, पाणी बिल आणि देखभाल खर्च भागवताना आर्थिक ताण जाणवत आहे.**

**-मिलिंद कदम, हॉटेल व्यवस्थापक**

# हरवलेले पाच मोबाईल मालकांना सुपूर्द

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पोलीस ठाण्याने तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उल्लेखनीय कामगिरी करत हरवलेले व गहाळ झालेले एकूण पाच मोबाईल फोन हस्तगत करून संबंधित तक्रारदारांना परत दिले आहेत. अंदाजे एक लाख रुपयांच्या किमतीचे हे मोबाईल 'सीईआयआर' पोर्टलच्या माध्यमातून शोधण्यात पोलिसांना यश आले.

अलीकडील काळात मोबाईल हरवणे, चोरी जाणे किंवा गहाळ होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. अशा घटनांमध्ये अनेक नागरिक आर्थिक नुकसानासोबतच वैयक्तिक माहितीच्या गैरवापराच्या भीतीनेही त्रस्त होतात. याच पार्श्वभूमीवर माणगाव पोलीस ठाण्याने हरवलेल्या मोबाईल संदर्भातील तक्रारींची दखल घेत तांत्रिक पद्धतीने शोधमोहीम राबवली. असून सायबर गुन्हे व सुरक्षेबाबत नागरिकांनी जागरूक राहण्याचे आवाहन माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी केले आहे.

सीईआयआर पोर्टलच्या सहाय्याने संबंधित मोबाईलचे आयएमईआय क्रमांक ट्रॅक करून त्यांचा मागोवा घेण्यात आला. सखोल तपासानंतर पाचही मोबाईल हस्तगत



करण्यात आले. ता. २ मार्च रोजी सोमवारी माणगाव पोलीस ठाण्यात तक्रारदारांना बोलावून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मोबाईल त्यांच्या ताब्यात देण्यात आले. आपले हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने तक्रारदारांच्या चेहऱ्यावर आनंद वाहू लागला. त्यामुळे या तक्रारदारांनी समाधान व्यक्त करत माणगाव पोलिसांचे आभार मानले. यावेळी माणगाव पोलीस ठाण्यामार्फत नागरिकांना सायबर गुन्हे आणि सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात आले.

मोबाईल हरवल्यास तात्काळ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी तसेच 'सीईआयआर' पोर्टलवर नोंदणी करून संबंधित मोबाईल ब्लॉक करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, असेही आवर्जून सांगण्यात आले. तसेच अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, संशयास्पद कॉल्स किंवा मेसेजेसला प्रतिसाद देऊ नये, ओटीपी अथवा वैयक्तिक माहिती कोणालाही देऊ नये, अशा सूचना नागरिकांना देण्यात आल्या. सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी सजगता आणि तत्परता अत्यावश्यक असल्याचेही पोलिसांनी यावेळी स्पष्ट केले. माणगाव पोलीस ठाण्याच्या या कारवाईमुळे नागरिकांमध्ये अधिकच विश्वास निर्माण झाला असून, तांत्रिक साधनांचा योग्य वापर केल्यास गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे.

# रेवदंडा येथे रायगड बाईकर्स फेस्टिव्हल

## २०० बाईक रायडर्सचा सहभाग

**अलिबाग : प्रतिनिधी**

रेवदंडा समुद्रकिनारी आयोजित रायगड बाईकर्स फेस्टिव्हल सिझन १० उत्साहपूर्ण वातावरणात झाला. राज्यातील विविध भागांसह इतर राज्यांतून सुमारे २०० बाईक रायडर्स या फेस्टिव्हलमध्ये सहभागी झाले. यंदाचे वर्ष या उपक्रमाचे दहावे वर्ष असल्याने विशेष महत्त्व प्राप्त झाले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही फेस्टिव्हलची सुरुवात रस्ता सुरक्षा जनजागृती रॅलीने करण्यात आली. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड येथून या रॅलीचा शुभारंभ पोलीस उपअधीक्षक माया मोरे यांच्या हस्ते, पोलीस निरीक्षक, अलिबाग किशोर साळे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यानंतर बाईक रायडर्सनी शिस्तबद्ध व सुरक्षित राईडिंगचा संदेश देत रॅलीत सहभाग नोंदविला.

आंतरराष्ट्रीय बाईक रायडर प्रसाद चौलकर यांच्या संकल्पनेतून १० वर्षांपूर्वी रायगड बाईकर्स फेस्टिव्हलची सुरुवात करण्यात आली. रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला चालना मिळावी, स्थानिक संस्कृती व खाद्यपरंपरेची ओळख देशभरातील बाईक रायडर्सना व्हावी तसेच स्थानिक युवकांना बाईकिंग व साहसी उपक्रमांबाबत प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे.

हा फेस्टिव्हल केवळ पर्यटनापुरता मर्यादित नसून रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान म्हणूनही कार्यरत आहे. बाईक रायडर्समध्ये सेफ्टी गिअरचा वापर, सुरक्षित राईडिंग आणि शिस्तबद्ध बाईकिंग संस्कृती रुजविण्यासाठी या फेस्टिव्हलमधून विशेष संदेश दिला जातो.

# महाराजस्व अभियानाला उद्यापासून सुरुवात

## नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांना विविध प्रकारचे शासकीय दाखले व महसूल विषयक सेवा तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महसूल शिबिर अभियान ७ मार्चपासून सुरू होत आहे.

या अभियानाच्या माध्यमातून महसूल विभागाच्या विविध सेवांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, सर्व स्तरावरील नागरिकांनी या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी पत्रकार परिषदेत केले. या विशेष अभियानांतर्गत तालुक्यातील विविध भागांमध्ये महसूल शिबिरे आयोजित करण्यात आली असून नागरिकांना त्यांच्या गावाजवळच सेवा मिळणार आहेत. त्यामुळे कार्यालयीन फेऱ्या टाळून नागरिकांचे वेळ व खर्च दोन्ही वाचणार आहेत.

या अभियानाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. ७ मार्च - निकम स्कूल, लोणेरे १४ मार्च - ग्रामपंचायत तळाशेत - इंदापूर आणि ग्रामपंचायत निजामपूर १० एप्रिल - मराठी शाळा, विळे, १७



एप्रिल - बुद्ध विहार, गोरेगाव,८ मे - तलाठी भवन, माणगाव, १५ मे - ग्रामपंचायत मोरबा, ही सर्व शिबिरे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात येणार आहेत.

या शिबिरांमध्ये ग्रामीण भागातील नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन जीवनातील विविध समस्या आणि तक्रारी तातडीने निकाली काढण्यावर भर दिला जाणार आहे. विशेषतः उत्पन्न दाखला, जात दाखला, रहिवासी दाखला, वारस प्रमाणपत्र, ७/१२ उतारे, फेरफार नोंदी तसेच इतर महसूल विषयक कागदपत्रे तातडीने देण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया शिबिरातच पूर्ण केली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेशासाठी तसेच नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

प्रांताधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी सांगितले की, गेल्या वर्षी या अभियानाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. गतवर्षी एकूण १ हजार ६८० दाखले तातडीने वितरित करण्यात आले होते. यंदा त्यापेक्षा अधिक प्रमाणात दाखले देण्याचा आणि नागरिकांच्या तक्रारी व समस्या प्रभावीपणे सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या शिबिरांमुळे ग्रामीण भागातील लोकांच्या अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे शेतकरी, महिला, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या आवश्यक कागदपत्रांसह या शिबिरांना उपस्थित राहून शासनाच्या या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रांताधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी केले आहे.

# कन्या सन्मान उपक्रमाचा १००वा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सहज सेवा फाउंडेशन व सहज महिला फाउंडेशनच्या वतीने खोपोली परिसरातील रुग्णालयांमध्ये जन्माला येणाऱ्या कन्यारत्नाचे स्वागत करण्याचा उपक्रम ८ मार्च २०२५ पासून सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत कन्या जन्मल्यावर मातेला अभिनंदन पत्र देऊन सन्मानित करण्यात येत आहे.

या उपक्रमाला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत असून ५ मार्च २०२६ रोजी या उपक्रमातील १०० व्या मातेला सन्मानित करण्याचा मान अजीमुननिशा शाहरुख खान यांना मिळाला आहे. कन्या रत्नाच्या जन्माचे स्वागत करण्याची ही संकल्पना समाजात मुलींबद्दल सकारात्मक भावना निर्माण करण्यासाठी आणि मुलगी हीच घराचे सौभाग्य हा संदेश देण्यासाठी राबविण्यात येत आहे.

आई होणे हा प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील अत्यंत आनंदाचा



आणि अभिमानाचा क्षण असतो. त्या आनंदात सहभागी होत नवजात बालिकेचे स्वागत करणे, मातेला शुभेच्छा देणे आणि तिच्या मातृत्वाचा सन्मान करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

सहज सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.शेखर जांभळे तसेच सहज महिला फाउंडेशन, खोपोलीच्या अध्यक्षा निलम विलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, या उपक्रमाचे नेतृत्व सागरिका योगिता शेखर जांभळे करत आहेत. समाजात कन्या जन्माचा आनंद साजरा व्हावा आणि मुलींच्या जन्मा बद्दल सकारात्मक संदेश जावा, या हेतूने हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे.

आज झालेला १००वा सन्मान हा या उपक्रमासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून, पुढील काळातही हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे सहज सेवा फाउंडेशनच्या व सहज महिला फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले.

१००व्या सन्मान उपक्रमासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, खोपोलीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. संगीता वानखेडे, डॉ.धनंजय किसवे, डॉ. सना, राखी गिरी, शोभा पाचारणे, वंदना पाटील, शिल्पा पेमारे, शुभांगी ओहोळ, वैशाली खंडागळे व सहज सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.शेखर जांभळे, सचिव अखिलेश पाटील, खजिनदार संतोष गायकर, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, खालापूर तालुका प्रमुख मोहन केदार तसेच सहज महिला फाउंडेशनच्या अध्यक्षा निलम पाटील, संघटिका रेश्मा जुनगरे, उपक्रम प्रमुख सागारिका जांभळे आणि नगरसेवक विनायक तेलवणे उपस्थित होते.

# खालापुरातील निगडोली येथे मंदिराचे भूमिपूजन

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील निगडोली येथे श्री अम्मा भगवान मंदिराचे भूमिपूजन देशभरातील हजारो अनुयायी यांच्या उपस्थितीत करण्यात आला, यावेळी त्यांचा ७७ वा वाढदिवसदेखील साजरा करण्यात आला.

श्री अम्मा भगवान म्हणजे विजय कुमार नायडू आणि त्यांची पत्नी हे भारतातील प्रसिद्ध आध्यात्मिक गुरू आणि एकता संस्थेचे संस्थापक आहेत. आंध्र प्रदेशातील वरदैयापलेम येथे मुख्यालय असलेल्या या संस्थेद्वारे मानवाला दुःखातून मुक्त करणे, आंतरिक शांती आणि वैश्विक जागृती साठी दीक्षा देतात. त्यांचे जगभरातील १६५ देशात लाखो अनुयायी आहेत. मानवी मनाला दुःखातून मुक्त करणे आणि आत्म जागृती देणे हा त्यांचा प्रमुख उद्देश आहे. खालापूर तालुक्यातील निगडोली या गावात सुमारे सात एकर जागेत हे भव्य मंदिर त्यांचे अनुयायी उभे करीत आहेत.विविध धार्मिक उपक्रमाने आजचा कार्यक्रम सुरू झाला, श्री अम्मा भगवान यांचा ७७वा वाढदिवसदेखील साजरा करण्यात आला. प्रेम, नाते, संबंध आणि आर्थिक समृद्धी आणण्यासाठी दीक्षा कार्यक्रमाची सुरुवात झाली आहे.



यातुन मानवतेचे कल्याण आणि आध्यात्मिक विकास साधला जाईल असे कार्यक्रमाच्या माध्यमातून सांगितले. परिसरातील अनेक अनुयायीदेखील उपस्थित होते.

# भाजपचे सचिन चाळके यांनी जपली सामाजिक बांधिलकी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष तथा भाजप कायदा सेल खालापूर तालुका पश्चिम मंडळ संयोजक ॲड.सचिन चाळके यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमानी साजरा करण्यात आला. यामध्ये नढाळ आदिवासीवाडी येथील रायगड जिल्हा परिषद शाळेतील विदयार्थ्यांना खाऊ, पेरूच्या वृक्षाचे वाटप तसेच आदिवासी भजन मंडळास मृदुंग व टाळ असे भजन साहित्याचे वाटप केल्याने ॲड.सचिन चाळके यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले जात आहे.

यावेळी खालापूर पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य कृष्णा पारंगे, लोधीवली ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तथा विदयमान सदस्य समीर दळवी, सदस्या भारती चाळके, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर सावंत, लोधीवली ग्रामपंचायत भाजपचे शक्ती केंद्रप्रमुख राजेंद्र मोरे, सामाजिक कार्यकर्ते सुहास शिंदे, कृष्णकांत चाळके, सुदाम वाघमारे, शिक्षिका भाग्यश्री अमित पिडगुळे तसेच आदिवासी ग्रामस्थ व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थितीत होता. तर शाळा केंद्रप्रमुख अरूण बडे गुरूजी यांनी उपस्थित मान्यवरांचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देवुन स्वागत करीत शाळेच्या वतीने ॲड.सचिन चाळके यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी आदिवासी भजन मंडळाचे गायक ह.भ.प.बाळाराम महाराज वाघ यांनी ॲड.सचिन चाळके व संपुर्ण चाळके परिवाराचे आभार मानले असून उपस्थितीत मान्यवरांचे केंद्र प्रमुख अरूण बडे गुरूजी यांनी आभार मानून ॲड.सचिन चाळके यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

# वारे केंद्र शाळेत सांस्कृतिक कलाविष्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वारे गावात असलेल्या रायगड जिल्हा परिषदेचे केंद्र शाळेत वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कलाविष्कार या नावाने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांच्या बहारदार सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली.

वारे केंद्र शाळेचे मुख्याध्यापक मच्छिंद्र रढे आणि सर्व शिक्षक वर्गाने नेहमीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी केंद्रस्तरावरील सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. उपशिक्षक प्रदीप सैदाने, दिनकर बागुल आणि किशोर बडाख यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण



भागातील शालेय विद्यार्थ्यांनी नृत्यकला, लोकनृत्य, आदिवासी लोकनृत्य, देशभक्तीपर गीत - नृत्य आदी विविध प्रकारातील तब्बल ३० हून अधिक सादरीकरणे सादर केली. विद्यार्थ्यांची आकर्षक वेशभूषा, नेटक्या हालचाली, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि विषयांची वैविध्यपूर्ण मांडणी यामुळे कार्यक्रम अधिकच रंगतदार ठरला.

विद्यार्थ्यांच्या या प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांकडून भरभरून दाद मिळत राहिली. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांचे मनःपूर्वक कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासास मोठी चालना मिळते. असे मत व्यक्त केले. शाळा प्रशासनाने राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल पालकवर्ग, ग्रामस्थ यांनी समाधान व्यक्त केले.या शाळेत खैरपाडा, मानकेवली, करकुलवाडी, कुरुंग आणि वारे गावातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

# काशीद ग्रामपंचायत विशेष पुरस्काराने सन्मानित

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यामधील काशीद ग्रामपंचायतीने शासनाच्या ग्राम विकास खात्यामार्फत राबविलेल्या सर्व योजना यशस्वी पूर्ण करून उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत सन २०२२-२०२३ या वर्षीचा विभाग स्तराचा सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल कोकण विभागात विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

या पुरस्कारात काशीद ग्रामपंचायतीस प्रमाणपत्र व चेक ने सव्वा दोन लाख रुपये पुरस्कार धन राशी देण्यात आली आहे.सदरचा पुरस्कार कोकण आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



हा पुरस्कार या ग्रामपंचायत सरपंच संतोष राणे, ग्रामपंचायत अधिकारी सुशांत ठाकूर व मुरुड पंचायत समिती गट विकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, ग्रामपंचायत कर्मचारी प्रशांत खेडेकर यांनी स्वीकारला आहे. सदर पुरस्कार वितरण वेळी अतिरिक्त आयुक्त सालेमठ, अप्पर आयुक्त दिवे, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले आदी उपस्थितीत होते.

ग्रुप ग्रामपंचायत काशीदने शौचालय व्यवस्थापन, घनकचरा, सांडपाणी, मैला गाळ उपसा, पाणी गुणवत्ता, पाणी व्यवस्थापन यामध्ये निपुण कामगिरी केली आहे. मुरुड तालुक्यातील काशीद ग्रामपंचायत मध्ये सर्वाधिक पर्यटक येत असतात.वाढत्या पर्यटक व स्थानिक नागरिक यांना सुयोग्य सुविधा देण्याचे काम काशीद ग्रामपंचायत करीत आहे.

याबाबत अधिक माहिती सांगताना काशीद ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी सुशांत ठाकूर यांनी सांगितले की, अभियानात आमच्या ग्रामपंचायतने सहभाग घेतला होता. महिला बचत गट, शाळा, अंगणवाडी, शासकीय कार्यालय या सर्वांचे तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती स्वच्छता विभाग यांचे मार्गदर्शन लाभल्याने आम्ही या पुरस्कारस पात्र ठरलो आहोत. आमचे सर्व ग्रामपंचायत सदस्य व सरपंच यांनी सुधा योगदान दिल्याने आम्हाला कोकण विभागात स्थान मिळाल्याची भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली.

या ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष राणे यांनी सांगितले की, शासनाची प्रत्येक योजना काशीद ग्रामपंचायत मध्ये प्रभावीपणे राबवण्यात येतात. शिस्त बद्ध काम व नियोजन सर्वांचे सहकार्य यामुळे आम्हाला हा पुरस्कार मिळाला आहे. मी ग्रामपंचायत हद्दीमधील सर्व लोकांचे आभार मानत आहे.

# न्यूझीलंडची फायनलमध्ये धडक

## निर्णायक सामन्यात दक्षिण आफ्रिका पुन्हा अपयशी

**कोलकाता : वृत्तसंस्था**

सलामीवीर फिन ॲलनने अवघ्या ३३ चेंडूंत ठोकलेल्या नाबाद १०० धावांच्या जोरावर न्यूझीलंडने टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडाक्यात प्रवेश केला. ईडन गार्डन्सवर रंगलेल्या या पहिल्या उपांत्य लढतीत किवीज संघाने दक्षिण आफ्रिकेला २० षटकांत ८ बाद १६९ धावांवर रोखले आणि हे लक्ष्य केवळ एका गड्याच्या बदल्यात १२.५ षटकांतच पूर्ण केले.

फिन ॲलनने आपल्या खेळीत १० चौकार आणि आठ उत्तुंग षटकार खेचत आफ्रिकन गोलंदाजांची दाणादाण उडवली. त्याला सलामीवीर टीम सायफर्टने (५८ धावा) मोलाची साथ दिली. दक्षिण आफ्रिकेकडून कागिसो रबाडाला (१/२८) एकमेव बळी मिळवता आला.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेची अवस्था ११व्या षटकात ५ बाद ७७ अशी बिकट अवस्था झाली होती. डेवाल्ड ब्रेविसने काही आकर्षक फटके खेळत २७ चेंडूत ३४ धावा केल्या, मात्र जेम्स नीशमच्या गोलंदाजीवर तोही बाद झाला.



संघ अडचणीत असताना जॅन्सेन आणि स्टब्स यांनी डाव सावरला. दोघांनी सहाव्या विकेटसाठी ७३ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. जॅन्सेनने ३० चेंडूत नाबाद ५५ धावांची तुफानी खेळी केली. त्याने पाच षटकार ठोकत संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले. ट्रिस्टन स्टब्सने २९ धावांचे योगदान दिले.

डावाच्या शेवटी दक्षिण आफ्रिकेने २० ओव्हर्समध्ये आठ विकेट्स गमावत १६९ धावा केल्या. सुरुवातीला न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी वर्चस्व गाजवले असले तरी शेवटच्या ओव्हर्समध्ये जॅन्सेनच्या आक्रमक फलंदाजीमुळे संघाला चांगला स्कोर उभा करता आला.

### फिन एलनचे विक्रमी शतक

न्यूझीलंड संघाच्या विजयाचा हिरो ठरला फिन एलन. सलामीवीर फिनने अखेरच्या चेंडूवर शतक झळकावत विश्वविक्रम केला आहे. फिनने फक्त ३३ चेंडूत १० चौकार व आठ षटकारांसह आणि ३०३.०३च्या स्ट्राईक रेटने फटकेबाजी करत शतक झळकावले. त्याच्या आधी टी-२० विश्वचषक इतिहासात ख्रिस गेलने २०१६मध्ये ४७ चेंडूत वानखेडेच्या मैदानावर शतक झळकावले होते. आता फिनने त्याला मागे टाकत सर्वात जलद शतक झळकावण्याचा हा जागतिक विक्रम आपल्या नावे केला आहे.

# वरसोली बीचलगत क्रिकेट स्पर्धा रंगली



**मुरूड : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ अलिबागच्या वतीने वरसोली येथील समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या मैदानावर क्रिकेट स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये अलिबाग लायन्ससह डायमंड्सचे महिला संघही सहभागी झाले होते.

अलिबाग लायन्स क्लब अध्यक्ष प्रदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या टूर्नामेंट्सच्या उद्‌घाटन समारंभास फर्स्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर प्रवीण सरनाईक, डिस्ट्रिक्ट को-ऑर्डिनेटर अनिल म्हात्रे, नितीन अधिकारी, सचिव महेश कवळे, खजिनदार अमोघ किंजवडेकर, अलिबाग डायमंड अध्यक्ष श्रुती सरनाईक, डॉ. रेखा म्हात्रे, ॲड. महेश म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपला शारीरिक फिटनेस जपून खिलाडूवृत्ती वाढवण्यासाठी सर्व लायन मेंबर्सने अशा प्रकारे नियमितपणे मैदानात उतरण्याचे आवाहन उद्‌घाटनावेळी फर्स्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सरनाईक यांनी केले.

पुरुषांमध्ये अलिबाग संजय पाटील टीम विजेती आणि परेश भतेजा यांची टीम उपविजेती ठरली. महिलांमध्ये चित्रा लोंढे टीमने विजेतेपद पटकाविले. लायन्स नवोदित तरुणांसह अगदी सिक्सटी प्लस ज्येष्ठ मेंबर्सचा सहभाग हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले. यानिमित्ताने दीडशेहून अधिक लायन मेंबर्स खिलाडूवृत्तीने एकत्र आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी लायन्स क्लबचे रोहन पाटील, रोहन रायकर, संजय पाटील, परेश भतेजा, प्रियदर्शनी पाटील, संतोष सागवेकर, रणजित जैन, अमोघ किंजवडेकर, संतोष पाटील, महेंद्र पाटील, भगवान मालपाणी, अविनाश राऊळ, रमेश धनावडे, संजय माळी, दीपक पाटील, जितेन पाटील, अनिल आगाशे, नितीन शेडगे यांच्यासह डिस्क्ट्रिक्ट स्पोर्ट्स चेअरपर्सन प्रितम गांधी आणि इतर सर्व लायन्स आणि डायमंड्स मेंबर्स यांनी परिश्रम घेतले.

# मार्करमचा मिशेलने घेतलेला झेल वादाच्या भोवऱ्यात

**मुंबई : प्रतिनिधी**

दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या सामन्यात एक वादग्रस्त झेल चर्चेचा विषय ठरला आहे. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्करम बाद झाल्यानंतर हा झेल खरोखर योग्य होता का यावर सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली आहे.

न्यूझीलंडच्या फिरकी गोलंदाजांनी सुरुवातीला दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजीवर चांगले नियंत्रण मिळवले. ऑफ-स्पिनर कोल मॅककोन्ची आणि डावखुरा फिरकीपटू रचिन रवींद्र यांनी प्रोटियाजच्या मजबूत फलंदाजीला मोठा धक्का दिला. मॅककॉन्चीने एका ओव्हरमध्येच दोन विकेट्स घेत क्विंटन डी कॉक आणि रायन रिकेल्टन यांना बाद केले. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेची सुरुवातच वाईट झाली.

या सामन्यात एडन मार्करम २० चेंडूत १८ धावांवर खेळत होता. रचिन रवींद्राच्या गोलंदाजीवर त्याने मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला. चेंडू डीपमध्ये गेला आणि डॅरिल मिशेलने झेल घेतला, मात्र हा झेल योग्य होता का याबाबत शंका निर्माण झाली आहे. स्वतः मिशेललाही सुरुवातीला खात्री नव्हती. तिसऱ्या पंचांनी मात्र हा झेल योग्य मानत मार्करमला बाद केले. यानंतर सोशल मीडियावर या निर्णयावरून वाद सुरू झाला आहे.



# पाकिस्तानी क्रिकेटरचे हॉटेलमध्ये महिला कर्मचाऱ्याशी गैरवर्तन

**कोलंबो** : टी-२० विश्वचषकातील खराब कामगिरीमुळे आधीच टीकेचा धनी ठरलेल्या पाकिस्तान क्रिकेट संघातील एका खेळाडूने श्रीलंकेतील कँडी येथे एका महिला हॉटेल कर्मचाऱ्याशी छेडछाड केली. त्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या शिस्तपालनावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

हॉटेलमधील हाऊसकीपिंग विभागात काम करणाऱ्या एका महिला कर्मचाऱ्याशी पाकिस्तानी खेळाडूने गैरवर्तन केल्याचा आरोप आहे. पीडित महिला मदतीसाठी ओरडल्यानंतर कर्मचारी तिथे पोहचले आणि त्यांनी ही बाब पाकिस्तानचे संघ व्यवस्थापक नवीद चीमा यांच्या कानावर घातली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून चीमा यांनी मध्यस्थी केली आणि खेळाडूच्या वतीने माफी मागत त्याला आर्थिक दंड ठोठावून हे प्रकरण अंतर्गत पातळीवर मिटवण्याचा प्रयत्न केला. त्या खेळाडूचे नाव अद्याप उघड करण्यात आलेले नाही.


# पाकिस्तान क्रिकेटमध्ये मोठे फेरबदल

## बाबर, फखरची संघातून हकालपट्टी; नवोदितांना संधी

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक २०२६मधील अत्यंत निराशाजनक कामगिरीनंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) कठोर पावले उचलली आहेत. ११ मार्चपासून सुरू होणाऱ्या बांगलादेशविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी स्टार फलंदाज बाबर आझम याला संघातून वगळण्यात आले आहे.

केवळ बाबरच नाही, तर पाकिस्तानने संघात अनेक मोठे बदल केले आहेत. गेल्या एकदिवसीय सामन्यात अर्धशतक झळकावणाऱ्या आणि आयसीसी स्पर्धेत समाधानकारक कामगिरी करणाऱ्या फखर झमानलाही संघातून वगळण्यात आले आहे. संघ व्यवस्थापनाने त्याला बाहेरचा रस्ता दाखवून मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये नवा संघ तयार करण्याचे संकेत दिलेत.



संघातील इतर महत्त्वाच्या अनुपस्थित खेळाडूंमध्ये सैम अयुब आणि नसीम शाह यांचा समावेश आहे. बाबरप्रमाणेच सैम अयुबदेखील फलंदाजीत आपली छाप पाडण्यात अपयशी ठरला होता, ज्यामुळे त्याला विश्वचषकातील न्यूझीलंडविरुद्धच्या महत्त्वपूर्ण सामन्यातूनही वगळण्यात आले होते. त्याच्या अनुपस्थितीत साहिबजादा फरहानला संधी देण्यात आली आहे. साहिबजादाने विश्वचषकात दोन शतके झळकावून खळबळ माजवली होती तसेच विराट कोहलीचा एकाच टी-२० विश्वचषकात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रमही मोडीत काढला होता.

### शाहीनकडेच नेतृत्व, रिझवानचे पुनरागमन


विश्वचषकातील पराभवानंतर शाहीन शाह आफ्रिदीला कर्णधारपदावरून हटवण्याची मागणी होत असतानाही त्याच्याकडेच नेतृत्व कायम ठेवण्यात आले आहे. संघात स्थिरता राखण्यासाठी त्याला पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे तसेच विश्वचषक संघाचा भाग नसलेल्या मोहम्मद रिझवानचेही संघात पुनरागमन झाले आहे. विशेष म्हणजे, बांगलादेशविरुद्ध पाकिस्तानने सहा नवोदित खेळाडूंना संधी देऊन आपली 'बेंच स्ट्रेंथ' आजमवण्याचा निर्णय घेतला आहे.

# भारतासोबत झालेली मालिका 'गेम चेंजर' ठरली -फिन एलन

**कोलकाता : वृत्तसंस्था**

सलामीवीर फिन एलनने अवघ्या ३३ चेंडूंत ठोकलेल्या विक्रमी शतकाच्या जोरावर न्यूझीलंडने टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडाक्यात प्रवेश केला. आता फिन लनने आपल्या स्मरणीय खेळीबाबत 'इंडियन फॅक्टर' महत्त्वाचा ठरल्याचे म्हटले आहे.

सामन्यानंतर बोलताना लनने आपल्या झंझावाती खेळीचे श्रेय भारताबरोबरील मालिकेला दिले. तो म्हणाला,



विश्वचषकापूर्वी भारतासोबत झालेली पाच सामन्यांची मालिका आमच्यासाठी 'गेम चेंजर' ठरली. त्या मालिकेतील काळ्या मातीच्या खेळपट्ट्यांवर खेळण्याचा अनुभव उपांत्य सामन्यात खूप कामी आला. विश्वचषकासारख्या मोठ्या स्पर्धेपूर्वी अशा प्रकारची तयारी इतर कुठेही होऊ शकली नसती.

आमच्या गोलंदाजांनी सुरुवातीलाच विकेट्स घेत दक्षिण आफ्रिकेवर दबाव निर्माण केला. त्यामुळे फलंदाजांचे काम सोपे झाले. सलामीचा जोडीदार टिम सायफर्टच्या (३३ चेंडूत ५८ धावा) फटकेबाजीमुळे आपला आत्मविश्वास वाढल्याचेही लनने सांगितले.

विशेष म्हणजे, आगामी आयपीएलमध्ये फिन दोन कोटींच्या बोलीसह कोलकाता नाईट रायडर्सकडून (केकेआर) याच मैदानावर खेळताना दिसणार आहे. आपल्या भावी 'होम ग्राउंड'वर पहिलेच शतक झळकावल्याचा आनंदही सामना जिंकल्यानंतर त्याने व्यक्त केला.

# एकतर्फी पराभवामुळे एडन मारक्रम निराश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संपूर्ण टी-२० विश्वचषक २०२६मध्ये अपराजित राहिलेल्या एडन मारक्रमच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिकेला सेमी फायनलमध्ये पराभव पत्करावा लागला. न्यूझीलंड संघाने नऊ विकेट्सने दक्षिण आफ्रिकेचा एकतर्फी पराभव करत अंतिम सामन्यात धडक मारली आहे. या पराभवानंतर कर्णधार मारक्रमने आपल्या भावना व्यक्त केल्या.

मारक्रम संघाच्या कामगिरीबद्दल म्हणाला, सुरुवातीची परिस्थिती पाहता प्रतिस्पर्ध्यांनी नवी चेंडूने अप्रतिम गोलंदाजी केली. चेंडू नीट बॅटवर येत नव्हता. काही चेंडू खेळपट्टीवर थांबत होते, तर काही बॅटच्या खालच्या भागाला लागत होते. त्यामुळे धावा करणे खूप कठीण झाले. त्या दडपणातूनच विकेट्स गेल्या. त्यांच्या गोलंदाजी युनिटला पूर्ण श्रेय द्यावे लागेल.

फलंदाजीत कोणी अशा प्रकारची खेळी केली, तर क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला निकाल आपल्या बाजूने आणणे अवघड होते. १७० धावांपर्यंत पोहचणे हा आमच्यासाठी चांगला प्रयत्न होता. मध्यांतराच्या वेळी आम्हाला वाटले की सामना आमच्या आवाक्यात आहे, पण ते सामन्यात पुढे निघून गेले आणि तिथून सामना परत ओढून आणणे खूप कठीण झाले. फिन एलन आणि टीम सेफर्ट यांच्या खेळीमुळे सामना आमच्या हातातून निसटला, असे मारक्रमने कबूल केले.



आज वेगळे काय करता आले असते?, या प्रश्नावर बोलताना मारक्रम म्हणाला, आता लगेच सांगणे कठीण आहे. आम्ही संघ म्हणून यावर शांतपणे विचार करू. आम्हाला वाटले होते की खेळपट्टी चांगली साथ देईल; पाहता ती तशीच दिसतही होती. कदाचित फलंदाजांनी परिस्थितीशी थोडे लवकर जुळवून घेतले असते आणि थोडी पारंपरिक पद्धत अवलंबून डाव उभा केला असता, तर १९० धावांपर्यंत मजल मारता आली असती, ज्यामुळे सामना चुरशीचा झाला असता. नक्कीच निकालामुळे निराशा आहे. संपूर्ण स्पर्धेत आमचे खेळाडू उत्कृष्ट खेळले, मात्र आजची संध्याकाळ आमच्यासाठी दुर्दैवी ठरली.

> **आमच्या संघाचा झालेला पराभव हा 'चोक' नव्हता, तर हा आमचा सपाटून झालेला पराभव होता. 'चोक' तेव्हा म्हणतात जेव्हा तुमच्याकडे विजयाची थोडी तरी संधी असते. आज आम्हाला संधीच मिळाली नाही. दक्षिण आफ्रिकन भाषेत सांगायचे, तर हा एक जोराची 'स्नॉटक्लॉप' (अनपेक्षित चपराक) होती. पराभवामुळे दु:ख असले तरी सलग सात सामने जिंकून उपांत्य फेरीपर्यंत मारलेल्या मजलचा सार्थ अभिमान आहे.**
>
> **-शुक्री कॉनराड,**
> द. आफ्रिकेचे प्रशिक्षक

### अनुभवातून अधिक मजबूत होऊ!

इतके चांगले करूनही पुन्हा एकदा अडखळल्यानंतर संघाला काय सांगशील, यावर मारक्रम म्हणाला, हो आम्ही निराश आहोत. हा पराभव म्हणजे चपराक नाही म्हणता येणार, पण तसेच जाणवत आहे. याच अनुभवातून आम्हाला अधिक मजबूत होऊन बाहेर यावे लागेल आणि पुढे जाताना अधिक चांगली कामगिरी करू.

# सानिया झाली तेंडुलकरांची सून!

## अर्जुनसोबत शाही लग्नसोहळा; दिग्गजांची उपस्थिती

**मुंबई : प्रतिनिधी**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा लेक अर्जुन तेंडुलकर हा सानिया चंडोकसोबत लग्नबंधनात अडकला आहे. अर्जुन आणि सानियाचा लग्नसोहळा पार पडला असून त्यांच्या या शाही लग्नसोहळ्याचे फोटो, व्हिडीओ समोर आले आहेत.

अर्जुन व सानियाने लाल रंगाचे आऊटफिट घातले होते, तर संपूर्ण तेंडुलकर कुटुंबानेही ट्रेडिशनल आऊटफिट परिधान केल्याचे दिसून आले. अर्जुन व सानियाने एकमेकांना वरमाला घालताच मिठी मारली. सचिन व पत्नी अंजली आनंदाने हसत होते, त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदाला पारावार उरला नव्हता. तर हातात करा घेऊन उभी असलेली बहीण सारा तेंडुलकरदेखील आनंदी दिसत होती.

सकाळपासूनच तेंडुलकरांच्या घरच्या या शाही लग्नसोहळ्याला दिग्गजांनी उपस्थिती लावली होती,



ज्याचे विविध व्हिडीओ सोशल मीडियावर पहायला मिळाले. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदी प्रमुख राजकीय नेत्यांसह माजी भारतीय कर्णधार महेंद्रसिंह धोनी, राहुल द्रविड हे त्यांच्या पत्नीसोबत दिसले. माजी क्रिकेटपटू आणि निवडकर्ता अजित आगरकरही पत्नीसोबत पोहचला. याशिवाय किरण मोरे, अनिल कुंबळे, अजिंक्य रहाणे, सुरेश रैना, वेंकटेश प्रसाद आदींनीदेखील सहपत्नी या लग्नात उपस्थिती दर्शवली. क्रिकेटर, उद्योजक, राजकारणी आणि बॉलीवूडमधील अनेक प्रतिष्ठित मंडळींनी या विवाहसोहळ्यास हजेरी लावल्याचे पहायला मिळाले.

# मार्को यान्सेनची युवीच्या एलिट क्लबमध्ये एन्ट्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोलकाताच्या ईडन गार्डन्सच्या मैदानात रंगलेल्या पहिल्या सेमीफायनलमध्ये मार्को यान्सेनच्या दमदार अर्धशतकाच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेच्या संघाने न्यूझीलंडसमोर १७० धावांचे टार्गेट सेट केले. न्यूझीलंडच्या गोलंदाजांसमोर आघाडीच्या फलंदाजांनी नांगी टाकल्यावर यान्सेन याने ३० चेंडूत दोन चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने ५५ धावांची नाबाद खेळी साकारली. यासह त्याने एक पराक्रम केला आहे.

मार्को यान्सेन याने या सामन्यात फक्त २७ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. टी-२० वर्ल्डकपस्पर्धेच्या नॉकआउटमध्ये सर्वात जलद अर्धशतक झळकणारा तो पाचवा फलंदाज ठरला आहे. या यादीत भारताचा माजी दिग्गज युवराज सिंग अव्वल स्थानावर आहे. २००७च्या हंगामात युवराजने ऑस्ट्रेलियाविरुद्ध २००७च्या सेमी फायनलमध्ये २० चेंडूत अर्धशतक झळकावले होते. मार्कोने सहाव्या विकेटसाठी ट्रिस्टन स्टब्सच्या साथीने ७३ धावांची भागीदारी रचली. ही टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील नॉकआउटमधील सहाव्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावरील दुसऱ्या क्रमांची सर्वोच्च भागीदारी आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com